



पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

• वर्ष १५ • अंक ३५७ • सोमवार, दि. ६ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. http://epaper:citynewssuperfast.com





## » थोडक्यात

### पुण्यात अख्ख कुटुंब ढिगाऱ्याखाली

**पुणे :** पुण्यातील मावळ तालुक्यातील पाठण गावात दुर्दैवी घटना घडलीये. अतिवृष्टीमुळे विसापूर किल्ल्याचा एक भाग कोसळून या गावातील एक कुटुंब गाडलं गेलंय. नंदू तिकोणेंच्या कुटुंबावर काळरात्र चालून आलीये. नंदू तिकोने, पत्नी आणि मुलगा घरात असताना काळानं घाला घातला. या तिघांचा शोध सुरू असून एनडीआरएफ पथकाकडून बचावकार्य सुरू आहे. आतापर्यंतएकाचा मृतदेह सापडला आहे. ही घटना ६ जुलैच्या पहाटेच्या सुमारास घडली.

---

### पावसाचं रौद्ररूप पुणे जिल्ह्यात अतिवृष्टी

**पुणे :** लोणावळ्यात २४ तासांत तब्बल ६७० मिमी पाऊस सुरू आहे. आज सकाळी ६.३० पर्यंतच्या २४ तासांत ६७० मिमी पाऊस झालाय. भिरामध्ये ६०९ मिमी, ताम्हिणी घाटात ५८० मिमी पाऊस, तर मावळ तालुक्यातील शिरगावला ५४० मिमी पाऊस कोसळलाय. लोणावळा-लवासा दरम्यानच्या आंबोश्यात ५३७ मिमी पाऊस, तर खोपोलीत २४ तासांत ५१६ मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

# 'इफ्रॉमॅनचा डिझास्टर मॅन झाला' -हर्षवर्धन सपकाळ

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावरील मिसिंग लिंकचा स्लॅब कोसळले

## मिसिंग लिंकचा स्लॅब कोसळल्यानंतर विरोधकांनी देवेंद्र फडणवीसांना घेरलं







प्रतिनिधी | ६ जुलै

**मुंबई :** लोणावळ्यातील मुसळधार पावसामुळे प्रचंड गाजावाजा करुन उभारण्यात आलेल्या मुंबई-पुणे एक्स्प्रेस मार्गावरील मिसिंग लिंकचा स्लॅब कोसळल्याची घटना घडली होती. हा स्लॅब कोसळून माती आणि पाण्याचा लोंढा थेट मिसिंग लिंकच्या रस्त्यावर आला होता. काही दिवसांपूर्वीच मिसिंग लिंकवर काही खड्डे पडल्याचे फोटो व्हायरल झाले होते. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंजिनिअरिंग टेक्निक सांगत विरोधकांना फटकारले होते. पहिल्या पावसात रस्त्याच्या ड्युराबिलिटी आणि इतर गोष्टींची टेस्ट होते, असा युक्तिवाद फडणवीसांनी केला होता. मात्र, सोमवारी मिसिंग लिंकच्या एन्ट्री पॉईंटजवळ स्लॅबलाच भगदाड पडल्याने विरोधकांनी देवेंद्र फडणवीस यांना घेरले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले आहे की, 'पहिल्याच पावसात ! दोन खड्डयांना 'पहिल्या पावसाचं टेस्टिंग' म्हणणारे मुख्यमंत्री, आता मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेच्या हजारो कोटींच्या 'मिसिंग लिंक' प्रकल्पावर दरड कोसळून रस्ता बंद झाल्यालाही 'मान्सून ट्रायल' म्हणणार का? जगभर डोंगर फोडून बोगदे उभे राहतात, पण महाराष्ट्रात पहिल्याच पावसात प्रकल्प कोसळतात. कारण समस्या पावसाची नाही, तर निकृष्ट कामांची, भ्रष्टाचाराची आणि कंत्राटदारांना मिळणाऱ्या राजकीय अभयाची आहे. हजारो कोटींचे प्रकल्प... पण पहिल्याच पावसात विकासच 'मिसिंग',' अशी टीका त्यांनी केलीय.

काँग्रेस नेते सतेज पाटील म्हणाले की, 'मिसिंग लिंकवरून सुरू असलेलं क्रेडिट वॉर आपण बघितलं आहे. आताच्या परिस्थितीचे देखील क्रेडिट यांनी घ्यावे. पावसाचा ऑरेंज अलर्ट होता आधी सांगायला पाहिजे होतं, मात्र नियोजन कुठेही दिसलं नाही. वाहतूक रखडणे, अपघात होताना द्रुतगती महामार्गावर दिसतात. हे फेल्युअर ऑफ गव्हर्नन्स आहे. मंत्री म्हणतात अजून परिस्थिती खराब होणार आहे, प्रचंड प्रमाणात पाऊस पडणार आहे. गैरसोय होऊ नये म्हणून सांगायला पाहिजे होतं ना. हे संवेदनहीन सरकार आहे. पुण्याहून मुंबईला येणारे मार्ग बंद आहे. सरकारनं कंट्रोल रुमच्या माध्यमातून काय घडते आहे हे बघणं गरजेचं आहे. अधिकारी, कर्मचारी कामकाजासाठी पोहोचले आहेत. सरकारनं आधी निवेदन करावं, उपाययोजना काय? हे सांगावं, किती मृत्यू झाले, मुंबई पुणे महामार्ग कधी सुरू होणार? हे सांगावे,' असे त्यांनी म्हटले.

### 'विकास मिसिंग' लिंक रोड : रोहिणी खडसे

» राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे म्हणाल्या की, 'मिसिंग लिंक रोड नव्हे तर 'विकास मिसिंग' लिंक रोड! पुणे–मुंबई द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाचा मोठा गाजावाजा झाला. दोनच महिन्यांपूर्वी मोठ्या थाटामाटात या रोडचा उद्घाटन सोहळा पार पडला. पण पहिल्याच पावसात या रोडवर खड्डे पडले. त्यावर लोकांनी प्रश्न विचारला तर 'ट्रायल सुरू होती,' असं सांगितलं गेलं. आज थेट दरड कोसळून वाहतूक बंद झाली आहे. खरंतर महायुती सरकारचा विकास जाहिरातींमध्येच दिसतो. प्रत्यक्षांत मात्र 'विकास' मिसिंग आहे! जनतेच्या पैशातून उभारलेले प्रकल्प टिकाव धरत नसतील, तर तो विकास नसून जनतेच्या विश्वासाशी केलेला खेळ आहे,' असे टीका त्यांनी केलीय.

### हे सरकार टक्केवारीचे : विजय वडेट्टीवार

» काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, 'मिसिंग लिंक असेल किंवा इतर ठिकाणी दरड कोसळणे, हे सरकार टक्केवारीचे आहे. टक्केवारी घेतल्याने सरकारकडूनही काहीही होणार नाही. सर्व काही मनगटाला रेटून कामं सुरू आहेत,' असा घणाघात त्यांनी केलाय.

# ध्येय गाठायचे असल्यास अभ्यासाशिवाय पर्याय नाही- पंकज देशमुख

## सनशाइन किड्स कॉन्व्हेंट चे मातोश्री इंदुमती देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी | ६ जुलै



अकोला- जीवनात आपले ध्येय साध्य करायचे असल्यास कठोर अभ्यासाशिवाय पर्याय नाही असे मत समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ अकोला चे सचिव माननीय पंकज देशमुख यांनी व्यक्त केले संस्थेतर्फे गायत्री नगर परिसरात नव्याने सनशाइन किड्स कॉन्व्हेंट सुरू करण्यात आली त्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून मातोश्री इंदुमती देशमुख उपस्थित होत्या तर अन्य मान्यवर अतिथी म्हणून संस्थेचे माजी अध्यक्ष सिद्धेश्वर देशमुख उपस्थित होते. प्रतिमापूजनाने व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

संस्थेतर्फे उपस्थित सर्व अतिथींचे स्वागत गुलाब पुष्पाचे रोपटे देऊन करण्यात आले. नव्यानेच प्रवेश घेतलेल्या मुलांचे प्रवेशद्वारावर टिळा लावून व चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले यावेळी कॉन्व्हेंट च्या प्रवेशद्वाराला रंगीबेरंगी फुग्यांची सजावट करण्यात आली होती.

याप्रसंगी संस्थेचे माजी अध्यक्ष सिद्धेश्वर देशमुख यांनी सुद्धा उपस्थिताना मार्गदर्शन केले. मातोश्री इंदुमती देशमुख यांच्या हस्ते सनशाइन किड्स कॉन्व्हेंट चे रिबीन कापून उद्घाटन करण्यात आले. मा गायत्री प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांना मातोश्री इंदुमती देशमुख यांच्या हस्ते गणवेश वाटप सुद्धा करण्यात आले. सनशाइन किड्स मध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांना नवनवीन खेळणी तसेच टिफिन खाण्यासाठी बेंच व खुर्च्या पाहून त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. शाळेचे मुख्याध्यापक संदीप वाघ मुख्याध्यापक सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक शिक्षक रामेश्वर बुंदेले, चंदा रोकडे, मीना काटे, वर्षा हिवराळे, वैशाली इंगळे, उज्वला सोळंके कीर्ती पोके या शिक्षकांसहित अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी चंद्र नील देशपांडे योगेश लंगोटे रणजीत ठाकूर आदींनी अथक परिश्रम केले.

# मानखुर्दमध्ये तीन मजली चाळीचा भाग कोसळला!

राजेश जायस्वाल | ६ जुलै

## ५ चिमुकल्यांसह ६ जणांचा जागीच मृत्यू

**मुंबई :** राज्यभरासह मुंबई आणि उपनगरात मुसळधार पावसाचा रौद्रावतार बघायला मिळत आहे. अशातच मुंबईतील मानखुर्द भागात एका तीन मजली चाळीचा भाग कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. धोकादायक असलेली ही चाळ रिकामी करण्यासाठी घरातील सामान आवरत असतानाच अचानक पावसाने घात केला आणि संपूर्ण घर कोसळले. या ढिगाऱ्याखाली गाडले गेल्यामुळे ५ निष्पाप लहान मुले आणि एका महिलेसह ६ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी गोवंडी रुग्णालयात जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले आहे. तर राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी देखील घटनास्थळी भेट दिलीय. यावेळी धोकादायक इमारतींची चौकशी होणार, अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली आहे. मुंबईतील मानखुर्द भागात जनता नगर परिसरात काल, रविवार (५ जुलै २०२६) रोजी रात्री साडे आठच्या सुमारास अत्यंत दुर्दैवी दुर्घटना घडली. जनता नगर परिसरात असलेल्या तीन मजली कच्च्या चाळीतील २ ते ३ घरे अचानक कोसळली. या दुर्घटनेत ५ लहान मुले आणि एक स्त्री अशा एकूण ६ जणांचा मृत्यू झाला आहे.

# खवा, ब्रेड आणि इतर खाद्य पदार्थ फेकले नाल्यात !

प्रतिनिधी | ६ जुलै



**मालेगाव :** राज्यभर अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सतत कारवाया सुरू आहे.या धास्तीचे परिणाम वाशीमच्या मालेगांव मध्ये रस्त्याच्या नाल्यात खवा,ब्रेड आणि इतर खाद्य पदार्थ फेकल्याने दिसून आले.हे खाद्य कुठून आले आणि कोणी फेकले याची चौकशी करून कारवाईची मागणी होत आहे.

राज्यभर अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवायांची धास्ती आता वाशिम जिल्ह्यातील मालेगाव शहरातही दिसून येत आहे. अकोला–वाशिम रोडवरील मालेगाव बायपास परिसरात रस्त्याच्या नाल्यात मोठ्या प्रमाणात खवा, ब्रेडची पाकिटे आणि इतर खाद्यपदार्थ फेकून दिल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, शहरात मोठ मोठी हॉटेल असतानाही गेल्या 28 ते 29 वर्षांत अशी परिस्थिती कधीच निर्माण झाली नव्हती.अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे ही भीती अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईची आहे का, असा प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# आषाढी वारीत वारकऱ्यांसाठी प्रथमच 'एअर ॲम्ब्युलन्स'!

## इमर्जन्सी स्थितीत वेळेत उपचार मिळणार, आरोग्य विभागाचा निर्णय

प्रतिनिधी | ६ जुलै



**पुणे :** आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्य सरकारने यंदा प्रथमच 'एअर ॲम्ब्युलन्स'ची (हेलिकॉप्टर रुग्णवाहिका) सेवा उपलब्ध करून देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यासोबतच संपूर्ण पालखी मार्ग डिजिटल यंत्रणेने जोडणारे आरोग्यसंपन्न वारी हे विशेष मोबाइल ॲपही यंदा सादर वेले जाणार आहे. यामुळे वारकऱ्यांना आपत्कालीन स्थितीत तत्काळ वैद्यकीय मदत मिळणे शक्य होईल.

वारीमार्गावर आपत्कालीन स्थितीत तातडीने उपचार देण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून 'बाइक ॲम्ब्युलन्स'चा वापर करण्यात येत आहे. मात्र, हृदयविकार, पक्षाघात किंवा अपघात झाल्यास तातडीने उपचार देणे गर्दीमुळे अनेकदा शक्य होत नाही. त्यामुळे 'एअर ॲम्ब्युलन्स'चा निर्णय घेण्यात आला आहे.

### वारी मार्गावर 353 ठिकाणी आयसीयूची सुविधा

वारीदरम्यान आपत्कालीन वैद्यकीय सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी पालखी मार्गावर 353 रुग्णवाहिका, 43 ठिकाणी अतिदक्षता विभागाची (आयसीयू) सुविधा आणि 156 प्राथमिक उपचार वेंद्रे कार्यरत राहणार आहेत. पंढरपूरमध्येही अतिरिक्त आयसीयू कक्ष, महाआरोग्य शिबिर आणि 24 तास वैद्यकीय सेवा असणार आहे. वारकऱ्यांच्या सेवेसाठी 3,087 वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच 302 तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
सोमवार दि. ६ जुलै २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## पावसाचा धुमाकूळ

निसर्गाचे वरदान असलेला पाऊस जेव्हा रौद्ररूप धारण करतो, तेव्हा त्याला 'पावसाचा धुमाकूळ' म्हणतात. उन्हाळ्याच्या काहिलीनंतर येणाऱ्या पावसाची आपण आतुरतेने वाट पाहत असतो, पण काही वेळा हाच पाऊस संपूर्ण जनजीवन विस्कळीत करून टाकतो. मुसळधार आणि संततधार पावसामुळे शहरांपासून ते गावांपर्यंत सगळीकडे हाहाकार माजतो.

जेव्हा पाऊस आपला धुमाकूळ सुरू करतो, तेव्हा नदी-नाले ओसंडून वाहू लागतात. रस्त्यांना नद्यांचे स्वरूप येते आणि सखल भागांत पाणी साचल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. रेल्वे आणि विमान सेवांवर याचा मोठा परिणाम होतो. चाकरमान्यांचे हाल होतात आणि कामावर जाणाऱ्या लोकांची तारांबळ उडते.

गावाकडची परिस्थिती तर अधिकच गंभीर होते. शेतात पाणी साचल्यामुळे हाताशी आलेली पिके वाहून जातात किंवा सडून नष्ट होतात. यामुळे शेतकऱ्यांचे कधीही न भरून निघणारे नुकसान होते. जुनी घरे, भिंती कोसळतात आणि अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या दुर्घटना घडतात. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे अंधाराचे साम्राज्य पसरते. पावसाचा हा धुमाकूळ आपल्याला निसर्गाच्या शक्तीची जाणीव करून देतो.

# जलपुनर्भरणबाबत अनास्था उद्याच्या वाळवंटाची नांदी?




आज आपण २१ व्या शतकात जगत आहोत. तंत्रज्ञानाने प्रगतीचे नवनवे टप्पे गाठले आहेत, पण या सगळ्या झगमगाटात आपण एका अत्यंत गंभीर आणि मूलभूत संकटाकडे डोळेझाक करत आहोत—ते म्हणजे पाण्याचे संकट. दरवर्षी उन्हाळा आला की पाणीटंचाईच्या बातम्या टीव्ही स्क्रीनवर झळकू लागतात, टँकरची संख्या मोजली जाते आणि पाण्यासाठी होणारी वणवण पाहून आपण हळहळतो. पण पाऊस सुरू झाला की, आपण हे सगळं विसरून जातो. ही जी आपली 'जलपुनर्भरण' संदर्भातली सामूहिक उदासीनता आहे, तीच खऱ्या अर्थाने उद्याच्या मोठ्या संकटाला आमंत्रण देत आहे.

**अनास्थेचे भयानक परिणाम**

केंद्रीय भूजल बोर्डाच्या अहवालानुसार भारतातील अनेक भागांमध्ये भूजल पातळी दरवर्षी काही मीटरने खाली जात आहे. जर हीच अनास्था कायम राहिली, तर पुढील काही वर्षांत अनेक शहरे 'झिरो वॉटर डे' (पाणी पूर्णपणे संपण्याचा दिवस) अनुभवतील. बोअरवेल कोरड्या पडणे: आज ५००-६०० फुटांवरही पाणी लागत नाही, याचे कारण आपण जमिनीत पाणी साठवलेच नाही.

**शेतीचे नुकसान:** भूजल पातळी खालावल्यामुळे विहिरी आटत आहेत, ज्याचा थेट फटका शेतकऱ्यांना आणि देशाच्या अन्नसुरक्षेला बसत आहे.

- पाणी जमिनीत न जिरल्यामुळे थोडे जरी जास्त पाणी पडले, तरी शहरांचे रस्ते नद्या बनतात. म्हणजेच, एकाच वेळी आपण पूर आणि पाणीटंचाई अशा दोन्ही संकटांना तोंड देत आहोत.

### निसर्गाचा नियम विरुद्ध मानवाचा हट्ट

निसर्गाचा एक साधा नियम आहे–'जे जमिनीतून घ्याल, ते जमिनीला परत द्यावे लागेल.' गेल्या काही दशकांमध्ये आपण कूपनलिका (बोअरवेल) आणि विहिरींच्या माध्यमातून जमिनीतील पाण्याचा उपसा अतोनात वाढवला आहे. पण, ते पाणी जमिनीत परत कसे जिरेल, याचा विचार आपण सोयीस्करपणे टाळला. शहरांचे काँक्रिटीकरण इतके वाढले आहे की, पावसाच्या पाण्याचा जमिनीशी संपर्कच तुटला आहे. रस्ते, सोसायट्यांचे आवार सगळं काही सिमेंट-काँक्रीटने झाकले गेले आहे. त्यामुळे पडणारा पाऊस जमिनीवर न पडता थेट नाल्यांमध्ये आणि तिथून समुद्रात वाहून जातो. आपण जणू जमिनीला प्लास्टिकचा कोट घातला आहे, ज्यातून एक थेंबही पाणी आत जाऊ शकत नाही.

- उपाय काय? अनास्था झटकून कृती करण्याची वेळ

- आता नुसती चिंता करून भागणार नाही, तर चिंतनाची जागा 'कृतीने' घेतली पाहिजे. जलपुनर्भरण ही केवळ सरकारची किंवा स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी नाही, ती प्रत्येक नागरिकाची चळवळ बनली पाहिजे.

**घरगुती पातळीवर सुरुवात :** आपल्या घराच्या, इमारतीच्या छतावर पडणारे पाणी पाईपद्वारे जमिनीत सोडण्याची सोपी यंत्रणा (रेन वॉटर हार्वेस्टिंग) कार्यान्वित करा.

- काँक्रीटने श्वास कोंडू नका: घराभोवतीचे अंगण पूर्णपणे सिमेंटचे न करता, तिथे पाणी जिरण्यासाठी मातीची जागा ठेवा किंवा सच्छिद्र पेव्हर ब्लॉक वापरा.

- शोषखड्डे ग्रामीण आणि शहरी भागांतही सांडपाणी किंवा पावसाचे पाणी जिरवण्यासाठी शोषखड्डे तयार करा.

- पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे, हे आपण लहानपणापासून पुस्तकात वाचत आलो आहोत, आता ते जगण्याची वेळ आली आहे. जर आपण आज जलपुनर्भरणाबाबतची आपली अनास्था सोडली नाही, तर पुढच्या पिढीला आपण वारसा म्हणून केवळ सोन्या-नाण्याची संपत्ती देऊ शकू, पण पिण्यासाठी शुद्ध पाण्याचा एक थेंबही देऊ शकणार नाही. -'पाणी जिरवा, जमीन जगवा... कारण जमीन जगली, तरच माणूस जगेल!'

### कायद्याचे कागदी घोडे आणि आपली उदासीनता

शासनाने नवीन इमारतींसाठी 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' छतावरील पाणी जमिनीत जिरवणे) बंधनकारक केले आहे.

पण प्रत्यक्षात काय परिस्थिती आहे? अनेक ठिकाणी केवळ इमारतीला परवानगी मिळवण्यापुरती ही यंत्रणा कागदावर किंवा नावापुरती उभारली जाते. ती चालू आहे की बंद, याकडे ना सोसायटीचे लक्ष असते ना प्रशासनाचे.

आपल्याकडे पाण्याचा कर भरला की 'आम्हाला पाणी मिळवणे हा आमचा हक्क आहे' असे मानले जाते. पण पाण्याचे संवर्धन करणे हे आपले 'कर्तव्य' आहे, ही भावना अजूनही आपल्यात रुजलेली नाही. पाणी ही विकत मिळणारी वस्तू नाही, तर तो निसर्गाचा मर्यादित ठेवा आहे, याचे भान आपण हरवून बसलो आहोत.

# सामाजिक वनीकरणाची उद्दिष्टपूर्ती होते का ?



सामाजिक वनीकरण आणि वृक्षारोपण या दोन्ही संकल्पना पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि मानवी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. आजच्या काळात वाढते शहरीकरण आणि जंगलतोड यांमुळे उद्भवणाऱ्या समस्यांवर हा एक प्रभावी उपाय आहे.

खाली या दोन्ही संकल्पनांचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. पारंपरिक जंगलांच्या पलीकडे जाऊन, जिथे लोक राहतात अशा सार्वजनिक, पडीक किंवा पिकांखाली नसलेल्या जमिनीवर स्थानिक लोकांच्या मदतीने झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करणे म्हणजे 'सामाजिक वनीकरण' होय.

**मुख्य उद्देश:** स्थानिक लोकांना जळाऊ लाकूड, चारा, लहान लाकूड आणि फळे उपलब्ध करून देणे, जेणेकरून मुख्य जंगलांवरील त्यांचा ताण कमी होईल.

सामाजिक वनीकरणाचे मुख्य प्रकार आहेत. ?शेत वनीकरण. शेतकरी आपल्या शेताच्या बांधावर किंवा पडीक जमिनीवर व्यावसायिक किंवा घरगुती उपयोगासाठी झाडे लावतात. ?सार्वजनिक वनीकरणात गावातील सामूहिक जमिनीवर (उदा. गायरान, पंचायतीची जमीन) संपूर्ण गावाच्या फायद्यासाठी सरकार आणि स्थानिक लोक एकत्र येऊन वृक्षारोपण करतात.

- रस्ता/रेल्वे कडेचे वनीकरण. रस्ते, रेल्वे लाईन, कालवे यांच्या दुतर्फा रिकाम्या जागेत झाडे लावणे. - वृक्षारोपण म्हणजे ठराविक उद्देशाने (पर्यावरण, सावली, फळे किंवा लाकूड) रोपे लावणे. ही एक वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर केली जाणारी कृती आहे. झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि आपल्याला ऑक्सिजन ($O_2$) देतात. यामुळे 'ग्लोबल वॉर्मिंग' नियंत्रित राहते.

- झाडांची मुळे माती घट्ट धरून ठेवतात, ज्यामुळे पावसाच्या पाण्याने जमिनीची धूप होत नाही.

- जलपातळीत वाढ: झाडांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते, परिणामी भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते. पक्षी, कीटक आणि छोट्या प्राण्यांना हक्काचा निवारा मिळतो.

- सामाजिक वनीकरण आणि वृक्षारोपणासमोरील आव्हाने आहेत. जरी या योजना चांगल्या असल्या, तरी त्यांच्या यशस्वीतेमध्ये काही अडचणी येतात:

अनेकदा झाडे लावली जातात, पण त्यांचे पुढे संगोपन केले जात नाही. पाण्याची कमतरतेमुळे उन्हाळ्यात पाण्याच्या अभावामुळे लावलेली रोपे वाळून जातात. स्थानिक हवामानाला पूरक नसलेली झाडे लावल्यास (उदा. जास्त पाणी शोषून घेणारा निलगिरी) जमिनीचे नुकसान होऊ शकते.

- स्थानिक वृक्षांना प्राधान्य दिले जावे. वड, पिंपळ, कडुनिंब, चिंच, आंबा, जांभूळ यांसारखी स्थानिक झाडे लावावीत, कारण ती कमी पाण्यातही टिकतात.

- 'झाडे लावा, झाडे जगवा': फक्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम न करता, ती झाडे मोठी होईपर्यंत त्यांच्या संरक्षणाची (गुरेढोरे आणि पाण्याचा तुटवडा यांपासून) जबाबदारी घेतली पाहिजे.

- लोकसहभाग देखील अत्यंत महत्त्वाचा आहे. शाळा, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून तरुणांना यात मोठ्या प्रमाणावर सामील करून घेणे गरजेचे आहे. ?थोडक्यात सांगायचे तर, सामाजिक वनीकरण आणि वृक्षारोपण ही केवळ सरकारी मोहीम नसून ती काळाची गरज आहे. आपण लावलेले एक झाड भविष्यातील पिढ्यांसाठी शुद्ध हवा आणि निरोगी जीवन देऊ शकते.

# भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर



भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे, ६ जुलै १९१७ रोजी भारतातील वैज्ञानिक प्राच्यविज्ञानाचे अग्रगण्य प्रणेते रामकृष्ण गोपाल भांडारकर यांच्या नावाचे आणि कार्याचे स्मरण करण्यासाठी स्थापना करण्यात आली. याला महाराष्ट्र सरकारच्या वार्षिक नियोजित अनुदानाचा अंशतः पाठिंबा आहे. संस्थेला विशिष्ट संशोधन प्रकल्पांसाठी भारत सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अनुदानही मिळाले आहे.

प्राच्यविद्या म्हणजे पूर्वेकडील किंवा 'ओरिएंट' या प्राचीन देशी विद्या आणि ज्ञानाचा अभ्यास. पूर्वेकडील, विशेषतः भारतात निर्माण झालेल्या सर्वसमावेशक ज्ञानाविषयी जगाला प्रबोधन करण्याच्या दृष्टीकोनासह प्राच्यविद्या क्षेत्रातील संशोधन कार्याशी संबंधित संस्था स्वतःशी संबंधित आहे. संस्थेकडे १,२५,००० पुस्तके आणि २८,००० पेक्षा जास्त हस्तलिखिते पसरलेल्या दुर्मिळ पुस्तकांचा आणि हस्तलिखितांचा सर्वात मोठा संग्रह आहे ज्यात ९० वर्षांच्या कालावधीत ओरिएंटोलॉजीच्या प्रत्येक पैलूचा समावेश आहे. या संग्रहामध्ये संस्कृत, प्राकृत, भारतीय प्रादेशिक भाषा, शास्त्रीय, आसियान आणि युरोपियन भाषा यासारख्या अनेक भाषा आणि लिपी समाविष्ट आहेत. याशिवाय, महाभारत आणि प्राकृत भाषांमधील संशोधन प्रकल्पांच्या पाठपुराव्याद्वारे त्यांनी अमूल्य संदर्भ संग्रह तयार केले आहेत.

संस्था तिच्या विविध मेमोरियल लेक्चरशिप अंतर्गत अतिथी विद्वानांकडून शिकलेल्या व्याख्यानांचे आयोजन करते. ऑल इंडिया ओरिएंटल कॉन्फरन्स, विविध चर्चासत्रे आणि अभ्यासपूर्ण चर्चाही संस्थेतर्फे आयोजित केल्या जातात. संस्था 'अ?नल्स ऑफ द भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट' हे वार्षिक नियतकालिक प्रकाशित करते. संस्थेची सर्वात प्रमुख प्रकाशने आहेत: महाभारताची गंभीर आवृत्ती, हस्तलिखितांचे वर्णनात्मक कॅटलॉग आणि प्राकृत शब्दकोश. भारताच्या सांस्कृतिक मंत्रालयाचा एक प्रकल्प, नॅशनल मिशन फॉर मॅन्युस्क्रिप्ट्सच्या आश्रयाखाली एक हस्तलिखित संसाधन आणि संवर्धन केंद्र देखील संस्था आयोजित करते. थोडक्यात, गेल्या नऊ दशकांपासून ही संस्था भारतशास्त्रीय अभ्यास आणि संशोधनाच्या अत्यंत महत्त्वाच्या केंद्राची भूमिका प्रभावीपणे बजावत आहे.

पहिल्या पिढीतील अभ्यासक आणि थोर समाजसेवक सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या ऐंशीव्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांच्या विद्यार्थ्यांनी आणि हितचिंतकांनी भांडारकर संस्थेची स्थापना केली. ६ जुलै १९१७ रोजी भांडारकर यांच्या सहस्रचंद्रदर्शनाचा योग साधून संस्था कार्यरत झाली. तत्कालीन मुंबई इलाख्याच्या ताब्यात असलेला हस्तलिखितांचा ठेवा १९१८ मध्ये संस्थेकडे देणगी म्हणून सोपविण्यात आला.

प्राच्यविद्येच्या क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातील संशोधकांच्या ज्ञानाची भूक भागविणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संस्थेचा सुवर्णकाळ आता इतिहासबद्ध होत आहे. 'भांडारकर'मध्येच ग्रंथपाल म्हणून अर्धशतकाहून अधिक काळ काम पाहिलेले वा.ल. मंजुळ हा इतिहास लिहीत आहेत. २०१७ मध्ये संस्थेच्या शताब्दी महोत्सवापूर्वी हा इतिहास जगासमोर आणण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

'भांडारकर'मध्ये झालेले संशोधनाचे कार्य, त्यामध्ये आपापला वाटा सक्षमपणे उचललेल्या व्यक्तींचे योगदान नव्या पिढीसमोर यावे, यासाठी हा इतिहास लिहिला जात आहे. संस्थेच्या स्थापनेसाठी 'आनंदाश्रमा'मध्ये झालेली बैठक, डॉ. रामकृष्ण भांडारकर, डॉ. नरहर सरदेसाई, डॉ. श्रीपाद बेलवलकर यांचे संस्थेच्या स्थापनेपासूनचे योगदान, संस्थेकडील हस्तलिखितांच्या संग्रहामध्ये होत असलेली प्रगती आणि त्याचे जतन करण्यासाठी होणारे प्रयत्न, संस्थेमध्ये कार्य करणाऱ्या सर्व ज्येष्ठ संशोधकांचे काम आणि त्यांच्याविषयीच्या आठवणींचा या इतिहासामध्ये समावेश होणार आहे.

### महाभारताची चिकित्सक आवृत्ती

संस्थेने १९१९ मध्ये महाभारताची चिकित्सक आवृत्ती प्रकाशित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. विष्णू सीताराम सुखठणकर यांची महाभारत प्रकल्पाच्या संपादकपदी नियुक्ती करण्यात आली. या प्रकल्पाला ब्रिटिश अॅकॅडमीने अर्थसाह्य केले होते. सुखटणकर यांच्या निधनानंतर श्रीपाद कृष्ण बेलवलकर यांच्याकडे संपादकपदाची धुरा सोपविण्यात आली. १९४३ मध्ये संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षांच्या कार्यक्रमास स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रपती झालेले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन उपस्थित होते. तर, १९६८ मध्ये झालेल्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमास राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन उपस्थित होते.

### महाभारत प्रकाशनमध्ये निजामाची देणगी

अतिथिगृहाची इमारत बांधण्यासाठी व महाभारत हे हिंदू महाकाव्य प्रकाशित करण्यासाठी पैशाची गरज होती.तेव्हा संस्थेने हैद्राबादचा सातवा निजाम मीर उस्मान अली खान याला विनंती केली. तेव्हा त्याने कोणताही वेळ न दवडता लगेच प्रतिवर्षी रु.१०००ची मदत ११ वर्षासाठी मंजूर केली. त्याबरोबरच अतिथिगृहासाठी रु.५०,०००ची मदत जाहीर केली.

### प्राच्य विद्या परिषद

अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद (ऑल इंडिया ओरिएन्टल कॉन्फरन्स) ही भांडारकर संस्थेने दिलेली देणगी आहे. संस्कृत आणि प्राच्यविद्या क्षेत्रातील अभ्यासक आणि संशोधकांचे संमेलन असे या परिषदेचे स्वरूप असून आतापर्यंत देशभरात विविध ठिकाणी ४७ परिषदा झाल्या आहेत.

# 20 व्या शतकातील असामान्य अलौकिक संत : गुलाबराव महाराज



आज जयंती

गुलाबराव महाराज यांचा जन्म ६ जुलै १८८१ मध्ये अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोणी टाकळी येथे झाला. ते महाराष्ट्रात होऊन गेलेले एक संत व मराठी लेखक होते. श्री. गुलाबराव महाराज हे विसाव्या शतकातील एक असामान्य अलौकिक संत होते. त्यांना वयाच्या आठव्या महिन्यात अंधत्व आले होते. त्यांचा जन्म तथाकथित निम्न जातीत झाला होता. सर्व आयुष्य ग्रामीण भागात गेले. अशा प्रतिकूल परिस्थितीत त्यानी एकूण १३४ ग्रंथ लिहिले. तेही फक्त ३४ वर्षांचे होते.

गुलाबराव महाराज यांनी बालपणीच ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला होता. 'भगवद्देह अनध्यस्त-विवर्त आहे, म्हणजे ज्ञानानंतर नाश पावत नाही' हा भक्तिसिद्धान्त शांकरतत्त्वज्ञानाच्या आधारावर मांडून त्यांनी मधुराद्वैत दर्शनाचा पुरस्कार केला. सांख्य-योगादी षड्दर्शने परस्परविरोधी नसून पूरक आहेत, असे त्यांनी वेळोवेळी सांगितले. 'भारतातील नानाविध धार्मिक संप्रदाय हिंदू, बौद्ध, जैनादी भारतीय धर्म आणि ख्रिस्ती, मुसलमानादी सर्व अभारतीय धर्म, वैदिक धर्माच्याच एकेका अंशावर स्थित आहेत' असे विचार ते मांडत असत. डार्विनचा उत्क्रांतिवाद, स्पेन्सरचे तत्त्वज्ञान इ. पाश्चात्य विचारसरणी त्यांना मान्य नव्हती. शंकराचार्य, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास या संतांच्या ग्रंथांचे सार एकत्रित करून गुलाबराव महाराजांनी आपल्या अवघ्या ३४ वर्षांच्या आयुष्यात ग्रंथनिर्मिती केली.

आर्य हा वंश असून तो बाहेरून भारतात आला, हे मॅक्समुल्लरचे व लोकमान्य टिळकांचे मत गुलाबराव महाराजांना मान्य नव्हते. प्राचीन ग्रंथांतील गणित, रेडियम, ध्वनी, ईथर, इलेक्ट्रॉन्स, उष्णता-गति-प्रकाश, विमानविद्या, अणुविज्ञान वगैरेंचे अनेक मौलिक संदर्भ त्यांनी दाखविले. वेदान्त, उपनिषदे, आत्मज्ञान, प्राचीन संत साहित्य, ध्यान-योग-मधुराभक्ती, आयुर्वेद, डार्विन-स्पेन्सर आदी शास्त्रज्ञांचे सिद्धान्त - हे त्यांच्या अभ्यासाचे, चिंतनाचे व लेखनाचे विषय होत. 'मधुराद्वैत' (मधुरा भक्ती व अद्वैत विचार यांचा समन्वय) हा नवा विचार त्यांनी भक्तांना दिला.

गुलाबराव स्वतःला संत ज्ञानेश्वरांची कन्या मानत असत. कृष्णपत्नी मानून मंगळसूत्रादी स्त्रीचिन्हेही ते धारण करीत. महाराजांच्या नंतर त्यांचा संप्रदाय बाबाजी महाराज पंडित यांनी इ.स. १९६४ पर्यंत चालविला. गुलाबराव महाराज यांचे २० सप्टेंबर १९१५ मध्ये पुणे येथे वयाच्या ३४ व्या वर्षी निधन झाले.

### जन्मांध असूनही १३३ ग्रंथांचे लिखान

गुलाबराव महाराज यांना त्यांना वयाच्या आठव्या महिन्यात अंधत्व आले होते. असे असूनही मराठी, हिंदी व संस्कृत भाषेवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. गुलाबराव महाराज यांनी काव्यशास्त्र, आयुर्वेद, संगीत इत्यादी अनेक विषयांवर लेखन केले. संस्कृत, हिंदी, मराठी या भाषांतून व वऱ्हाडी बोलीतून त्यांनी १३३ ग्रंथ लिहिले. सूत्रग्रंथ, भाष्य, प्रकरण, निबंध, प्रश्नोत्तरे, पत्रे, आत्मचरित्र, आख्याने, नाटक, लोकगीते, स्तोत्रे, व्याकरण, कोश वगैरे वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले. २७,००० ओव्या, २,५०० अभंग, २,५०० पदे, ३,००० श्लोकादी रचना आदींचा त्यांत समावेश आहे.

### प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराजांच्या ज्ञानाचा परिचय

मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज एकदा ख्यातनाम मुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररीत गेले. ग्रंथालयात विशिष्ट विषयांवरील कुठले ग्रंथ आहेत, या जिज्ञासेपायी त्यांनी ग्रंथपालांना विचारणा केली. ग्रंथपाल महाराजांना ओळखत नव्हता. एक अंध व्यक्ती ग्रंथांची विचारपूस करते म्हणून त्या सर्वच लोकांना कुतूहल वाटले. ग्रंथपालाच्या सहकाऱ्याने महाराजांना ग्रंथांची नावे सांगणे सुरू केले. बहुतांश ग्रंथ महाराजांना माहित होते. या ग्रंथांचा क्रम कसा लावावयास हवा, हे महाराज त्या-त्या ग्रंथातील सारांशाच्या आधारे त्या ग्रंथालयकर्मीला सांगत होते. ग्रंथपाल व आजूबाजूचे लोक महाराजांचे ज्ञान पाहून थक्क झाले. चौकशीअंती त्यांना समजले की अत्यंत सामान्य दिसणारी ही अंध व्यक्ती म्हणजे मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज आहेत.

### अलौकिक प्रतिभेचे धनी

गुलाबराव महाराजांचा जीवनपट विलक्षण आहे. अमरावती जिल्ह्यात नांदगाव (खंडे)ता. लोणीला महाराजांचा जन्म झाला. मातृवियोगानंतर सहा वर्षे बडनेराजवळ असलेल्या लोणी टाकळी येथे गुलाबराव महाराजांचे वास्तव्य होते. घरातील वातावरण पूर्णपणे प्रतिकूल. आठव्या महिन्यातच आजाराने डोळे गेले म्हणून आंधळेपणा आलेला. अशा स्थितीत महाराजांनी सर्व ज्ञान कसे प्राप्त केले.

हा प्रश्न सामान्य माणसाला निश्चित पडतो. इंग्रजीतील आधुनिक विज्ञानावरचे, धर्म आणि अध्यात्म शास्त्र, संस्कृतातील गायनशास्त्रावरचे, वैद्यक शास्त्रावरचे, विविध कला विषयांचे, वेद-उपनिषदांसह सर्व ग्रंथांचे वाचन त्यांनी वयाच्या १२ ते १६ वर्षांच्या काळातच करून घेतले. प्रपंच किंवा परमार्थ असा एकही विषय राहिला नाही की ज्यावर गुलाबराव महाराजांनी आपले स्वतंत्र विचार प्रगट केले नाहीत. महाराष्ट्रातीलच नव्हे, तर उत्तरेकडचे व बंगालकडचेही जे मोठे विद्वान त्यांच्या संपर्कात आले ते सर्व त्यांची अलौकिक प्रतिभा पाहून थक्क झाले. त्यांच्या शुद्ध आचरणाला व अगाध ज्ञानाला भुलून लोक त्यांच्याकडे आकर्षित झाले. मानभाव मत, डार्विन मत, स्पेन्सर, मायर्स यांच्या मतांवर आणि ग्रंथांवर महाराजांनी समीक्षा केली. जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा केली. विविध विषयांवरच्या १३४ ग्रंथांचे लेखन महाराजांनी केले. मराठी, हिंदी, ब्रज, संस्कृत भाषेत लेखन केले. काव्य, योग, संगीत, धर्म, सांख्यशास्त्र, वेदान्त, छंदशास्त्र असे सर्व विषय हाताळले. हे अगाध ज्ञान महाराजांनी केव्हा व कसे प्राप्त केले असेल हा विषय आजही आपल्या विचारक्षमतेच्या बाहेरचाच आहे.

### अचाट स्मरणशक्तीची लाभली होती देणगी

महाराज जवळच्या लोकांकडून पुस्तके वाचून घेत असत. अगाध स्मरणशक्तीच्या आधारे एकदा ऐकताच त्यांच्या स्मरणात राहत असे. त्यांच्यासाठी पुस्तक वाचणारा कधीच रिकाम्या हाताने परत गेला नाही. प्रत्येकाला दक्षिणा द्यायचे. ज्वारी, गहू, हातातील चांदीचे कडे, घरातील मौल्यवान वस्तू. ग्रंथ वाचून दाखविणाऱ्याला गुरुदक्षिणा म्हणून त्यांनी काय काय वस्तू दिल्या असतील ते त्यांना किंवा घेणाऱ्यालाच माहिती. महाराजांनी आपल्या आयुष्यात कशाचा मोह बाळगला असेल तर तो केवळ ज्ञानलालसेचा, अर्थातच ग्रंथांचा आणि पुस्तकांचा! पत्नीचे एक लुगडे व स्वतःच्या अंगावर बंडी आणि धोतर या शिवाय महाराजांजवळ कुठलीच संपत्ती नव्हती. जवळच्या मंडळींकडे त्यांनी कशाचा आग्रह धरला असेल तर तो म्हणजे फक्त पुस्तकांचा. गुलाबराव महाराजांनी दोन हजारहून अधिक ग्रंथ जवळ बाळगले. पुस्तकांच्या पेट्या डोक्यावर घेऊन कितीही मैलांचा प्रवास ते पती-पत्नी करीत.. ती दुर्मिळ अशी ग्रंथसंपदा आजही अमरावतीत सुरक्षित आहे. या ग्रंथसंपदेवर महाराजांचा जीव होता. 'ज्ञानेश्वरी-गूढार्थदीपिका' ग्रंथाचे कर्ते वेदान्तकेसरी बाबाजी महाराज पंडित या आपल्या शिष्योत्तमावर महाराजांचे प्रचंड प्रेम होते. बाबाजी महाराजांची गुरुभक्ती निःसीम होती. स्वतः गुलाबराव महाराजांनीच 'मी पंडिताला वश झालो आहे', असे उद्गार काढले होते. त्या बाबाजी महाराज पंडितांना गुलाबराव महाराजांनी आपल्या शेवटच्या काळात काही मोलाच्या सूचना केल्या होत्या. त्यात ग्रंथालयाची व्यवस्था चांगली ठेवावी, ही पण एक सूचना होती. बाबाजी महाराज पंडितांनी महाराजांच्या अन्य सूचनांप्रमाणेच याही सूचनेचे अत्यंत तंतोतंत पालन केले. परिणामी महाराजांचा हा धनसंग्रह आजही अमरावतीच्या परकोटाच्या आत दहिसाथीत असलेल्या ज्ञानेश्वर महाराज मंदिरात सुस्थितीत, सुरक्षितपणे जपून ठेवला आहे.

### महाराजांनी अकोल्याच्या चित्रकाराकडून ज्ञानेश्वर माउलींचे काढले होते चित्र

अंध असलेल्या गुलाबराव महाराजांनी अकोल्याच्या एका चित्रकाराकरवी ज्ञानेश्वर माउलींचे एक चित्र तयार करून घेतले होते. याच चित्राच्या आधारे नंतर ज्ञानेश्वर माउलींचा फेट्यातील समाधिस्थ बसलेले चित्र विविध चित्रकारांनी साकारले. ते चित्र आजही या ज्ञानेश्वर मंदिरात अग्रभागी लावण्यात आले आहे. गुलाबराव महाराजांच्या ग्रंथ संपदेत आज अत्यंत दुर्मिळ असलेल्या ग्रंथांचाही समावेश आहे. या ग्रंथसंपदेची संख्या दोन हजाराहून अधिक आहे.

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. ६ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# ज्योती नगर येथील बंद रेल्वे मोरीचा मोठा प्रश्न पाण्यासाठी लावलेल्या स्पीड ब्रेकरमुळे तरुणाचा मृत्यू

## 'अनिकेत गजभीये'च्या मृत्यूला जबाबदार कोण ?

प्रतिनिधी ६ जुलै



**अकोला :** ज्योती नगर रेल्वे लाईनच्या बाजूला असलेल्या पाणी अडण्यासाठी लावलेल्या सदोष स्पीड ब्रेकरमुळे (गतिरोधक) दुचाकी वरुन उसळलेल्या भीषण अपघातात 'अनिकेत गजभीये' या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, 'अनिकेतच्या मृत्यूला नेमके जबाबदार कोण?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. महापालिका या भागातील साचलेले पाणी काढण्यात अपयशी असून इतकेच नाही तर या भागात मोठ्या प्रमाणात जलकुंभी साचली आहे. त्याच बरोबर मध्य रेल्वेने या भागातील नैसर्गिक पाणी निघून जाण्याचे स्त्रोत बंद केले आहे. हा गंभीर विषय असून यामुळे लोकांचे बळी जात असेल तर रेल्वे आणि महापालिका आरोग्य विभाग झोपला आहे काय अशी विचारणा होत आहे. या घटने विषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. अशा घटना घडू नये यासाठी सजग राहणे आवश्यक आहे. असा सूर उमटला

### पाण्याचा निचरा रोखण्यासाठी टाकला होता स्पीड ब्रेकर!

जठारपेठ ज्योती नगर भागातील परिसरातील पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होत नसल्याने, ते पाणी रस्त्यावर किंवा वस्तीत येऊ नये या तात्पुरत्या हेतूने स्थानिकांनी स्पीड ब्रेकर उभारला होता. मात्र, हाच स्पीड ब्रेकर दूचाकी चालकासाठी ठरला. अनिकेत जंजाळ हा तरुण आपल्या दुचाकीवरून जात असताना, त्याची दुचाकी या अवाढव्य स्पीड ब्रेकरवरून प्रचंड वेगाने उसळली. वेग नियंत्रित न झाल्याने अनिकेत दुचाकीवरून खाली कोसळला. त्याच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

### रेल्वे मोरीचे पाणी काढणार कोण ?

या अपघातामुळे परिसरातील पाणी साचण्याच्या जुन्या समस्येला पुन्हा तोंड फुटले आहे. ज्योती नगर रेल्वे लाईन शेजारील रेल्वे मोरीचे पाणी काढण्याची आणि तिथली स्वच्छता करण्याची कायमस्वरूपी जबाबदारी नक्की कोणाची आहे? रेल्वे प्रशासनाची की स्थानिक महानगरपालिकेची? या दोन्ही यंत्रणांच्या अंतर्गत वादात आणि दुर्लक्षामुळे दरवर्षी पावसाळ्यात किंवा एरवीही येथे पाणी साचते. त्यावर उपाय म्हणून रस्ते नियमांचे उल्लंघन करून बनवलेले स्पीड ब्रेकर आता लोकांचा जीव घेऊ लागले आहेत. येथे मोठ्या प्रमाणात जलकुंभी देखील साचली असून ती काढण्याची गरज आहे. इतकेच नाही तर रेल्वेने पाणी निघून जाणाऱ्या बंद केलेल्या मोऱ्या खुल्या करण्याची स्थानिकांची मागणी आहे.

# साथीच्या आजारांना माशांचे आमंत्रण, दूकानदारांचे दूर्लक्ष

## महापालिका,अन्न व औषध प्रशासनाचे दूर्लक्ष अधोरेखित

प्रतिनिधी ६ जुलै



**अकोला :** पावसाळा सुरू होताच साथीच्या आजारांनी डोकं वर काढलंय, पण अकोला शहरात मात्र महापालिका आणि अन्न औषधी प्रशासनाच्या नाकाखाली नागरिकांच्या आरोग्याशी उघड खेळ सुरू आहे! शहरात उघड्यावर खाद्यपदार्थांची सर्रास विक्री होत असून, प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे पूर्णपणे डोळेझाक केली आहे.

अन्न औषधी प्रशासनाचे राज्य आयुक्त तुकाराम मुंढे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात शिस्त आणली असून गुटखा माफिया आणि भेसळखोरांच्या नाड्या आवळल्या आहेत. मात्र, अकोल्यातील स्थानिक अन्न औषधी विभाग आणि महानगरपालिका नेमकी कोणाची पाठराखण करत आहे ? उघड्यावरील या जीवघेण्या खाद्यपदार्थ विक्रीला तातडीने आळा बसणार कधी ? पावसाळा सुरू झाला की शहरात माशा आणि डासांचा प्रादुर्भाव प्रचंड वाढतो. घाणीवर बसलेल्या या माशा उघड्यावरील खाद्यपदार्थांवर घोंगावतात आणि तेच दूषित अन्न अकोलेकरांच्या पोटात जात आहे.

यामुळे गॅस्ट्रो, काविळीसारख्या भयंकर आजारांचा धोका निर्माण झाला आहे. अकोला महानगरपालिका स्वच्छतेच्या नावाने केवळ कागदी घोडे नाचवत असून, उघड्यावर दुकानं थाटून बसलेल्या विक्रेत्यांवर कुठलीही कारवाई करत नाहीये. अनेक बेजबाबदार विक्रेते खाद्यपदार्थ झाकून ठेवण्याची साधी तसदीही घेत नाहीत.अकोलेकरांचे आरोग्य धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. आता तरी महापालिका आणि स्थानिक एफडीए सक्रिय होऊन अकोलेकरांना या नरकयातनेतून मुक्त करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मनपाची बुरड गल्लीत पाईप लाईन फुटली हजारो लिटर पाणी वाहून गेले, टंचाईत भर

**अकोला :** एकीकडे शहरावर जलसंकट उभे राहत आहे. पाणी वाचवण्यासाठी प्रयत्न आवश्यक असताना पाईप लाईन फुटून हजारो लिटर पाणी वाहून जात आहे. फुटलेल्या जलवाहिन्या तातडीने दुरुस्त होत नाही. त्यामुळे विविध भागात पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात होतो. त्याला आळा घालणे गरजेचे आहे. शहराला पाणीपुरवठा करणा-या काटेपूर्णा प्रकल्पात १९ टक्के जलसाठा आहे. त्यामुळे महापालिका प्रशासन पाणी पुरवठा सात दिवसाआड करण्याच्या विचारात आहे. आणि दुसरीकडे पाण्याची नासाडी मोठ्या प्रमाणात होत आहे. बुरड गल्लीत पाईप लाईन फुटल्या मुळे पाणी वाहून गेले. शहरात कोणत्या तरी भागात दररोज जलवाहिनी फुटून पाणी वाहून जाते.

# महापालिकेच्या ढिसाळ कारभाराचा झाला 'चिखल'



**अकोला :** स्मार्ट सिटी आणि विकासकामांच्या नावाखाली अकोला महानगरपालिकेने शहरातील रस्त्यांची जी दैना केली आहे, त्याचा थेट फटका आता निष्पाप शालेय विद्यार्थ्यांना आणि सामान्य नागरिकांना बसत आहे. भारत विद्यालय समोरील रस्त्यावर सध्या चिखलाचे साम्राज्य पसरले असून, रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले आहे.

भूमिगत योजनेच्या नावाखाली रस्ते खोदून ते रामभरोसे सोडणाऱ्या प्रशासनाविरुद्ध आता नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. काही महिन्यांपूर्वी भूमिगत योजनेसाठी हा रस्ता मोठ्या दिमाखात खोदण्यात

### भारत विद्यालयासमोर विद्यार्थ्यांचे अतोनात हाल

आला. काम संपले की नाही, हे पाहण्याची तसदी न घेता कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांनी याकडे सपशेल पाठ फिरवली. रस्त्यावरील माती तशीच टाकून देण्यात आली. आता पावसाळा सुरू होताच या मातीचा प्रचंड चिखल झाला असून, हनुमान मंदिर ते भारत विद्यालय आणि बिल्डर सुनील हातेकर निवासकडे जाणारा रस्ता पूर्णपणे चिखलात रुतला आहे. या भागात साचलेल्या पाण्यामुळे डासांचे साम्राज्य वाढले असून, आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना, पादचाऱ्यांना आणि वाहनचालकांना या चिखलातून जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. अनेक विद्यार्थी चिखलात घसरून पडत आहेत, त्यांचे कपडे आणि पुस्तके खराब होत आहेत.

# घरकुल परिसरात सांडपाणी घरात शिरल्याने नागरिक त्रस्त; तातडीने उपाययोजना करा



प्रतिनिधी ६ जुलै

**मूर्तिजापूर :** पावसाळ्याला सुरुवात होताच मूर्तिजापूर शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील घरकुल परिसरात गंभीर स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सांडपाण्याची पाइपलाइन तुंबल्याने तसेच काही ठिकाणी सेप्टिक टाक्या फुटल्यामुळे घाण पाणी थेट नागरिकांच्या घरात शिरत असून रहिवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागतो आहे.घरकुल परिसरातील सांडपाणी तातडीने काढून स्वच्छता मोहीम राबवावी, तुंबलेली पाइपलाइन दुरुस्त करावी व सांडपाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही घरकुलवासीयांनी नगर परिषद प्रशासनाला दिला आहे.

### गोरगरिबांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

पावसाळ्याचे दिवस सुरू असून मोठ्या प्रमाणात घरकुल मध्ये घाण व सांडपाणी दिसत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांचे आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. आजार वाढण्याची शक्यता आहे. नगर परिषदेने मोहीम राबवून न्याय द्यावा.

शेख इमरान शेख खलील,
समाज सेवक

### न. प. चे मुख्याधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे

ज्या ठिकाणी गोरगरीब राहतात त्या ठिकाणी अस्वच्छता दिसून येत आहे. बऱ्याच ठिकाणी सांडपाणी दिसून येत आहे याकडे नगरपरिषद लक्ष का देत नाही स्वच्छतेसाठी येणारा निधी मग कोणासाठी?

**निजाम**
इंजिनियर, सामाजिक कार्यकर्ता

# काट्यात रुतला पाऊस तर, अकोल्यात घरोघरी पाणी

**अकोला :** पावसाळा लांबल्यामुळे जिल्ह्यातील जलप्रकल्प अजूनही तहानलेलेच आहेत. वान प्रकल्पात सध्या त्यातल्या त्यात समाधानकारक पाणीसाठा असला, तरी इतर सर्व प्रकल्पांना अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

अकोलेकरांची तहान भागवणाऱ्या मुख्य काटेपूर्णा प्रकल्पात तर सध्या केवळ २२ टक्केच साठा शिल्लक आहे. वाशीम जिल्ह्यात जोरदार पाऊस झाला, तरच काटेपूर्णा प्रकल्पाची पाणीपातळी वाढू शकते. त्यामुळे अद्यापही जिल्ह्यावरील पेयजलाचे संकट टळलेले नाही. काटेपूर्णा प्रकल्पातील पाणीपातळीकडे अकोला शहरासह संपूर्ण परिसराचे लक्ष लागून राहिले आहे; कारण अकोलेकरांना याच प्रकल्पातून पिण्याचे पाणी पुरवले जाते. जिल्ह्यातील 'काटा' भागात जर चांगला पाऊस झाला, तरच काटेपूर्णा धरणाची पातळी वाढण्यास मदत होते. मात्र, सध्या त्या भागातही म्हणावा तसा पाऊस झालेला नाही.

# भाजीपाल्याचे 'शतक': डब्यात काय द्यायचं ?

## शाळा सुरु होताच 'आई'च्या चिंतेत पडली भर !

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला :** आज मुलाच्या डब्यात भाजी काय द्यायची ?, टोमॅटो १०० रुपये, गवार १२० रुपये झाले आहे. रोज सकाळी उठून किचनमध्ये डब्याची तयारी करताना आता बजेटचा हिशोब मातांसाठी डोकेदूखी ठरत आहे.

जुलै महिना उजाडला की, एकीकडे पावसाची प्रतीक्षा आणि दुसरीकडे मुलांच्या शाळांची लगबग सुरू होते. पण यंदा पावसाने दिलेल्या फटक्याने बाजारात भाजीपाल्याचे दर कडाडले आहेत. बहुतांश भाज्यांनी ८० रुपयांचा टप्पा पार केला असून, काही भाज्या तर १०० ते १२० रुपये किलोवर पोहोचल्या आहेत. या कडकडत्या दरांचा थेट फटका बसला आहे तो घरच्या 'किचन बजेट'ला आणि शाळाकरी मुलांच्या मातांना. शाळा सुरू झाल्यामुळे मुलांना रोज डब्यात सुकी आणि पौष्टिक भाजी देणे गरजेचे असते. पण सध्या बाजारातली परिस्थिती पाहता पालकांची तारांबळ उडत आहे. मुलांच्या आवडीच्या भाज्या आवाक्याबाहेर आहेत. भेंडी, कोबी, फ्लॉवर किंवा पालक यांसारख्या पालेभाज्या थेट ८० रुपये किलोने विकल्या जात आहेत. डब्यासाठी हमखास बनवली जाणारी गवार शेंग किंवा ढेमसे १०० ते १२० रुपये किलोवर पोहोचल्याने त्या खरेदी करताना दहा वेळा विचार करावा लागत आहे. सर्वात स्वस्त बटाटे असून २५ ते ३० रुपये किलो बटाट्यात किती वेगवेगळ्या भाज्या करता येतील याचा विचार मातांना असतो. जोपर्यंत चांगला पाऊस पडून नवीन मालाची आवक वाढत नाही, तोपर्यंत हे भाज्यांचे दर नियंत्रणात येणे कठीण असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

# अकोल्यात धुराचे साम्राज्य !

## जुन्या वाहनांमुळे नागरिकांचा श्वास गुदमरला



प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला :** शहरात दिवसेंदिवस वायू प्रदूषणाची पातळी घातक ठरत असून, यामध्ये रस्त्यांवर धावणाऱ्या जुन्या व जीर्ण वाहनांचा मोठा वाटा असल्याचे धक्कादायक चित्र आहे. एसटी महामंडळाच्या अनेक कालबाह्य बसेस, खाजगी प्रवासी वाहने, जुने ऑटो-रिक्षा आणि देखभाल न केलेल्या दुचाकी वाहनांमधून मोठ्या प्रमाणात काळा धूर बाहेर पडत आहे. या विषारी धुरामुळे पर्यावरणाचा ऱ्हास तर होतच आहे.< शिवाय अकोलेकरांच्या आरोग्यावरही याचा विपरीत परिणाम होत आहे.शासनाने प्रदूषण करणाऱ्या आणि १५ वर्षांपेक्षा जुन्या वाहनांना रस्त्यावरून हटवून त्यांना 'स्क्रॅप' करण्याचे स्पष्ट धोरण जाहीर केले आहे. मात्र, अकोल्यात या नियमांना पुरते हरताळ फासले गेले आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नाकाखाली ही वाहने बिनधास्तपणे शहरात विषारी धूर सोडत फिरत आहेत. शहरातील अशोक वाटिका चौक, बस स्थानक परिसर, डाबकी रोड आणि मुख्य बाजारपेठेमध्ये काळा कुट्ट धूर सोडणाऱ्या वाहनांची संख्या लक्षणीय आहे. शहरात कालबाह्य झालेल्या आणि धूर सोडणाऱ्या वाहनांवर तात्काळ जप्तीची कारवाई व्हावी.

### वाढत्या वायू प्रदूषणाकडे आरटीओ आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष

# 250 वर्षे प्राचीन जगन्नाथ मंदिरात अनसर पूजा सुरु, 15-16 जुलैला रथयात्रा उत्सव



**अकोला :** भगवान श्री जगन्नाथ जी यांची गुप्त पूजा व अनसर उत्सव सध्या सुरू आहे. पंजाबराव कृषी विद्यापीठ परिसरातील अडीचशे वर्षे प्राचीन श्री जगन्नाथजी, सुभद्राजी व बलदेवजी मंदिरात वेदपाठी ब्राह्मणांच्या मंत्रघोषात विशेष पूजा-अर्चना होत आहे.

अनसर काळात भगवानांना ताप आल्याने त्यांच्या लवकर स्वस्थ होण्यासाठी शाल भेट देऊन विशेष प्रार्थना करण्यात आली. अकोला जिल्ह्यातील सर्व धरणे भरून पिकांना पाणी मिळावे, शेतकरी सुखी व्हावा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा यासाठी वेदपाठी ब्राह्मण हेमंत शर्मा, विजय दुबे, संतोष शुक्ला, जनक जोशी, वल्लभ शर्मा, राधेश्याम शर्मा, दिनेश शर्मा यांनी वेदमंत्रांनी पूजा केली. गिरीश जोशी, रमाकांत भरकर, माधव मानकर, गिरीराज तिवारी, संजय जोशी, मनोहर मानकर, प्रशांत लोहिया, अजय जोशी, अजय गुल्हाने, नितीन ढोले आदी भक्त उपस्थित होते.

# माजी आ. बळीरामजी सिरस्कार यांच्या वाढदिवसानिमित्त पालखीचे स्वागत, वृक्षारोपण व फराळ वाटप





प्रतिनिधी ६ जुलै

**पातूर :** बाळापूर मतदारसंघाचे माजी आमदार बळीरामजी सिरस्कार यांच्या जन्मदिनानिमित्त पातूर घाट परिसरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये श्री संत वासुदेव महाराज पालखी सोहळ्याचे उत्स्फूर्त स्वागत, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण तसेच भाविकांना फराळ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी माजी आमदार बळीरामजी सिरस्कार यांच्या सामाजिक व लोकहितवादी कार्याचा गौरव करत त्यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य व गटनेते श्रीकांतजी ढोणे, गजानन गाडगे, पैलवान संतोष राऊत, सचिन बारोकार, सचिन इंगळे, प्रदीप इंगळे, विलास धोंगडे, गणेश बिलबिले, किरणकुमार निमकंडे, संदीप सौदळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला तसेच पालखी सोहळ्यात सहभागी भाविकांना फराळाचे वाटप करून सेवाभावाची परंपरा जपली.

# हजारी मिल्क अँड प्रॉडक्टला दोन जिल्हाधिकारी, आ. हरीश पिंपळे यांची भेट

प्रतिनिधी ६ जुलै

**मुर्तिजापूर :** सुभाष दूध डेअरीचे संचालक व जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रशांत हजारी यांच्या हजारी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्टला अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना व यवतमाळ येथील जिल्हाधिकारी विकास मीना व आमदार हरीश पिंपळे यांनी भेट दिली.

येथे तयार होणारे दही, पनीर, तूप तसेच दुधाची पॅकिंग व इतर पदार्थांची पाहणी केली. हजारी यांनी जिल्हाधिकारी वर्षा मीना, विकास मीणा व आमदार हरीश पिंपळे, नगराध्यक्ष हर्षल साबळे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. योगिता नवाल यांनी प्लांट बाबत सांगितले.यावेळी नगरसेवक भारत जेठवानी , अमोल प्रजापति, सुधीर दुबे, ज्ञानेश टाले ,अन्वर खान , माधव भंडार, श्याम व इतर कर्मचारी उपस्थित होते.दुधाच्या माध्यमातून तयार होणारे पदार्थ व प्लांटवर असलेली स्वच्छता व पुरुषांच्या बरोबरीत महिला प्रत्येक क्षेत्रात काम करताना दिसत असल्याने हजारी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट येथील कार्यरत असलेल्या पुरवठा निरीक्षक योगिता नवाल यांचे कौतुक केले. दुग्ध व्यवसाय वाढीस लागावा म्हणून आ. पिंपळे नेहमी पुढाकार घेतात. अशातच त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा केली.

तालुक्यातील अनेक शेतकरी जोडधंदा म्हणून दूध व्यवसाय करत आहे अनेक शेतकऱ्यांना शेतमजुरांना याचा फायदा होत आहे आता मूर्तिजापूरचा दूध विदर्भाच्या कानाकोपऱ्यात जाणार.

**-हरीश पिंपळे**, आमदार, मुर्तिजापूर



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. ६ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## यवतमाळला पुन्हा दोन दिवसांचा यलो अलर्ट

प्रतिनिधी ६ जुलै

**यवतमाळ :** हवामान विभागाने यवतमाळ जिल्ह्याला पुन्हा दोन दिवसाचा एलो अलर्ट जाहीर केला आहे. या काळात विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात सोमवारी ढगाळी हवामान राहण्याचा अंदाज आहे. पावसाच्या सरी बरसण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यात गत २४ तासांमध्ये सरासरी १४ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. जिल्ह्यात सर्वत्र हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसला. रविवारी बहुतांश भागात पावसाची उघडीप राहिली. तर सोमवारी जिल्ह्यात ढगाळी हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. यामुळे काही भागात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मंगळवारी आणि बुधवारी जिल्ह्याला एलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. याकाळात ताशी ४० ते ५० किलो मीटर वेगाने वारा वाहण्याची शक्यता आहे. विजांच्या कडकडाटासह पाऊस बरसण्याचा अंदाज आहे.

# पळसवाडीत गुटखा कारखान्यावर धाड

### ४० लाखांचा मुद्देमाल जप्त : यवतमाळ शहर पोलिसांची कारवाई, पॅकिंग मशिनसह वाहनही ताब्यात

प्रतिनिधी ६ जुलै

**यवतमाळ :** शहरातील पळसवाडी परिसरात अवैधरित्या गुटखा व सुगंधित तंबाखूची साठवणूक करून विक्री करणाऱ्या कुमार रमेश ओझाणी यांच्यावर यवतमाळ शहर पोलिसांनी शनिवारी धडक कारवाई केली. या कारवाईत प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू, पॅकिंग मशिन व वाहनासह सुमारे ४० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.





यवतमाळ शहर गुन्हे प्रकटीकरण पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पळसवाडी येथील कुमार रमेश ओझाणी यांच्या घरावर छापा टाकण्यात आला. तपासणीदरम्यान घरात मोठ्या प्रमाणात अवैध गुटखा व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला. याबाबत अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले असता, प्राथमिक पाहणीत हा साठा प्रतिबंधित असल्याचे स्पष्ट झाले.

छाप्यात 'माझा १०८', 'बाबा सुगंधित तंबाखू' आणि 'बाबा नवरत्न पान मसाला' या विविध कंपन्यांच्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचे पोते जप्त करण्यात आले. तसेच सिलिंग व पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या पॅकलिफ्ट कंपनीच्या दोन मशिन्स, प्रत्येकी सुमारे साडेतीन लाख रुपये किमतीच्या, जप्त करण्यात आल्या. याशिवाय एमएच-०४ बीबी-२६९१ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर कारही ताब्यात घेण्यात आली.

जप्त करण्यात आलेल्या गुटखा व सुगंधित तंबाखूची किंमत सुमारे ३० लाख रुपये, पॅकिंग मशिन्सची किंमत ७ लाख रुपये आणि वाहनाची किंमत ६ लाख रुपये असून, एकूण मुद्देमालाची किंमत ४० लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक कोळी आणि ठाणेदार निर्देश सुडकेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक गणेश चव्हाण, उपनिरीक्षक नितीन मिश्रा, पोलीस हवालदार शेषराव शेडे, पोलीस कर्मचारी किरण एडके, महिला पोलीस कर्मचारी गजानन हारके, तसेच पोलीस अंमलदार प्रदीप कुडूकर, पवन तडसे, पवन नांदेडकर, गौरव ठाकरे, सूरज तेलंगवार, कुणाल पांडे यांनी सहभाग घेतला. अन्न व औषध प्रशासन कार्यालय, यवतमाळच्या अधिकाऱ्यांनीही या संयुक्त कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.

## 'विकसित भारत' संकल्पनेसाठी झरी-जामणीत जनजागृती अभियान

प्रतिनिधी ६ जुलै

■ गावागावांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविणे, रोजगारनिर्मितीला चालना देणे आणि ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढविणे हा अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**झरी-जामणी :** केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'विकसित भारत जनजागृती अभियानास' झरी-जामणी पंचायत समिती अंतर्गत १ जुलैपासून प्रारंभ झाला आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत असून ग्रामपंचायत स्तरावर विविध जनजागृती आणि जनसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

अभियानाअंतर्गत ग्रामीण नागरिकांना रोजगार, उपजीविका, जलसंधारण, नैसर्गिक साधनसंपत्ती संवर्धन, ग्रामीण पायाभूत सुविधा, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना तसेच इतर विकास योजनांची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. विशेषतः मनरेगा योजनेंतर्गत पात्र कुटुंबांना वर्षातून १२५ दिवस रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत जनजागृतीवर भर दिला जाणार आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायतींमध्ये विशेष जनजागृती कार्यक्रम, ग्रामसभा, लाभार्थी मेळावे आणि विविध विकास योजनांबाबत मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण विकासाला गती मिळून 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेच्या पूर्ततेस हातभार लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी दामोधर इंगोले

प्रतिनिधी ६ जुलै

**उमरखेड :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने युवा व सक्रिय कार्यकर्ते दामोधर शामराव इंगोले यांच्यावर विश्वास दाखवत त्यांची उमरखेड शहराध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. या नियुक्तीमुळे शहरातील पक्ष संघटनेला नवे बळ मिळणार असून, संघटनात्मक कामकाजाला अधिक वेग येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या मान्यतेनंतर यवतमाळ जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कामारकर यांनी इंगोले यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

पक्षाच्या वतीने देण्यात आलेल्या सूचनांनुसार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील विकासाभिमुख विचारधारा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, शहरातील संघटन अधिक मजबूत करणे आणि प्रत्येक घटकाला पक्षाशी जोडण्यासाठी प्रभावीपणे कार्य करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

दामोधर इंगोले यांनी पक्षाच्या ध्येय-धोरणांचा व्यापक प्रचार-प्रसार करून नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, तसेच युवक, महिला आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडून संघटनात्मक ताकद वाढवावी, अशी अपेक्षाही पक्ष नेतृत्वाने व्यक्त केली आहे.

त्यांच्या नियुक्तीचे शहरातील कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून, आगामी स्थानिक राजकारणात पक्षाला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## 'एचटीबीटी' बियाण्यांचा भांडाफोड; उत्पादक, वितरकांसह कृषी केंद्रचालकावर गुन्हा

### ७० पाकिटे जप्त; प्रयोगशाळा अहवालात प्रतिबंधित घटक आढळले

प्रतिनिधी ६ जुलै

**यवतमाळ :** प्रतिबंधित 'एचटीबीटी' कापूस बियाण्यांच्या विक्रीप्रकरणी उत्पादक कंपनी, वितरक आणि कृषी केंद्रचालकाविरोधात यवतमाळ शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. नागपूर येथील प्रयोगशाळेच्या अहवालात जप्त करण्यात आलेल्या बियाण्यांमध्ये प्रतिबंधित घटक आढळून आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुजरातमधील सुरत येथून यवतमाळमध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित 'एचटीबीटी' कापूस बियाणे आणण्यात येत असल्याची गोपनीय माहिती कृषी विभागाला २० मे रोजी मिळाली होती. त्यानुसार कृषी विभाग, स्थानिक गुन्हे शाखा आणि यवतमाळ शहर पोलिसांनी चिंतामणी पॉइंट परिसरात सापळा रचून शिहोरी ट्रॅव्हल्स (क्र. एआर-२० ई-००९९) या बसची तपासणी केली.

### अधिकृत पाकिटांतूनच प्रतिबंधित बियाण्यांची विक्री

■ प्रतिबंधित 'एचटीबीटी' कापूस बियाणे अधिकृत कंपन्यांच्या पाकिटांत भरून विक्री करण्यात आल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे. नागपूर प्रयोगशाळेच्या अहवालात बंदी असलेले जनुकीय घटक आढळून आल्याने शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे समोर आले असून, या प्रकारामुळे बियाणे विक्री व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तपासणीदरम्यान पाटीदार सीड्स प्रायव्हेट लिमिटेड, अहमदाबाद या कंपनीने उत्पादित केलेले आणि रूबिकॉन सीड्स, अहमदाबाद या कंपनीमार्फत विपणन करण्यात आलेले 'रीधी ७५७५' आणि 'रीधी ६४०' या ब्रँडची एकूण ७० कापूस बियाण्यांची पाकिटे जप्त करण्यात आली. या मालाची किंमत सुमारे ६३ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

संबंधित शेतकऱ्याची चौकशी केली असता, ही बियाणे सुरत येथील सरदार ॲग्रो अँड बीज निगम या कृषी केंद्रातून खरेदी केल्याचे समोर आले. अधिकृत पाकिटांमधून विक्री करण्यात आलेली ही बियाणे प्रत्यक्षात प्रतिबंधित असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचेही स्पष्ट झाले.

जप्त बियाण्यांचे नमुने नागपूर येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. या तपासणीत प्रतिबंधित 'एचटीबीटी' बियाण्यांमध्ये आढळणारे घटक पॉझिटिव्ह आढळून आले. त्यानंतर कृषी अधिकारी धीरज मोहेकर यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या तक्रारीच्या आधारे पाटीदार सीड्स प्रायव्हेट लिमिटेड, अहमदाबाद, रूबिकॉन सीड्स, अहमदाबाद आणि सरदार ॲग्रो अँड बीज निगम, सुरत येथील कृषी केंद्रचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक शिवदर्शन बिरादार करीत आहेत.

## रक्तदानातून भानुदास शिंदेंना अभिवादन

प्रतिनिधी ६ जुलै

**दिग्रस :** स्वर्गीय भानुदास शिंदे यांच्या ६३ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना मानवसेवेच्या माध्यमातून अभिवादन करण्यासाठी ७ जुलैला दिग्रस येथील कान्होबा पेट्रोल पंप परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भानुदास विठ्ठल शिंदे फाउंडेशनच्या वतीने हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहे.



स्व. भानुदास शिंदे यांनी आयुष्यभर जपलेली सामाजिक बांधिलकी, सेवाभाव आणि मानवतेची मूल्ये आजही अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्याऐवजी समाजोपयोगी कार्यातून त्यांचे स्मरण व्हावे, या उद्देशाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमातून गरजू रुग्णांना मदत करण्यासोबतच समाजात परस्पर सहकार्य, संवेदनशीलता आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ करण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात आहे. स्व. शिंदे यांच्या सेवाभावी विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचावा आणि समाजात मानवतेची मूल्ये अधिक बळकट व्हावीत, हीच या उपक्रमामागील प्रेरणा असल्याचे आयोजकांनी सांगितले. रक्तदान हे श्रेष्ठ दान मानले जाते. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करून या मानवसेवेच्या पवित्र कार्यात सहभागी व्हावे, तसेच स्व. भानुदास शिंदे यांच्या स्मृतींना कृतिशील अभिवादन करावे, असे आवाहन भानुदास विठ्ठल शिंदे फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय पुरस्काराने डॉ.निरज वाघमारे यांचा गौरव

प्रतिनिधी ६ जुलै

**यवतमाळ :** समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल इक्वेरा – इन्स्टिट्यूट फॉर इन्क्लुझिव्ह अँड सस्टेनेबल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे संचालक व सामाजिक कार्यकर्ते डॉ. निरज वाघमारे यांना 'यंग अचिव्हर्स – सामाजिक संस्था' या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वाग्धारा आणि भारत एक्सप्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने अंधेरी येथील मुक्ती ऑडिटोरियममध्ये झालेल्या 'वाग्धारा सन्मान समारोह–२०२६'मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



तेलंगणा राज्याचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ल यांच्या हस्ते डॉ. वाघमारे यांना पुरस्कार देण्यात आला. यावेळी आचार्य पवन त्रिपाठी, भारत एक्सप्रेस न्यूज नेटवर्कचे अध्यक्ष व संपादक-इन-चीफ उपेंद्र राय, वाग्धाराचे अध्यक्ष डॉ. नागेश सारस्वत यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. वाघमारे गेली दोन दशके आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे, दलित, आदिवासी, स्वच्छता कर्मचारी, महिला, बेरोजगार युवक-युवती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबवत आहेत. शासनाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविणे तसेच लोकसहभागातून विकासाला चालना देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या पुढाकारातून कचरा संकलन वाहने, मोफत अंत्यसंस्कारासाठी 'स्मृती रथ', रुग्णवाहिका सेवा, शवपेटी (शीतकक्ष) सुविधा तसेच महिला आरोग्य व स्वच्छता विषयक जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात आले आहेत. स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठीही त्यांनी विविध स्तरांवर काम केले आहे. इक्वेरा फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समावेशक विकास, शाश्वत उपजीविका, महिला सक्षमीकरण आणि वंचित समुदायांच्या विकासासाठी संशोधन, प्रशिक्षण व जनजागृतीचे कार्यक्रम राबविले जात आहेत. त्यांच्या कार्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली असून यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी डॉ. वाघमारे यांचे अभिनंदन केले असून, हा पुरस्कार समाजसेवेची जबाबदारी अधिक वाढविणारा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## 'तराश'मध्ये उमरखेडची चमक; दोन विद्यार्थ्यांना मोफत जेईई-नीट प्रशिक्षणाची संधी

प्रतिनिधी ६ जुलै

**उमरखेड :** माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात प्रथम क्रमांक पटकावत तब्बल ११ लाखांचे पारितोषिक मिळविणाऱ्या आणि एनएमएमएस परीक्षेत जिल्ह्यात अव्वल ठरलेल्या उमरखेड येथील महात्मा फुले विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड (डब्ल्यूसीएल) आयोजित 'तराश' परीक्षेत विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश संपादन केले आहे.

टॅलेंट ॲम्प्लिफिकेशन ऑफ रुरल यूथ स्किल हंट (तराश) या उपक्रमांतर्गत डब्ल्यूसीएलने कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधीतून दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षा आयोजित केली होती. या परीक्षेत महात्मा फुले विद्यालयाची दुर्गेश्वरी संतोष जाधव आणि गोविंदराज नलावडे यांनी यश मिळविले आहे.

या परीक्षेसाठी एक हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी केवळ ४० विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. यामध्ये २० विद्यार्थ्यांची जेईईच्या माध्यमातून अभियांत्रिकी शिक्षणासाठी, तर २० विद्यार्थ्यांची नीटच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे.





निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या अकरावी व बारावीच्या संपूर्ण शिक्षणाचा खर्च, जेईई व नीट परीक्षांच्या तयारीसाठी लागणारा शैक्षणिक खर्च, निवास व भोजन व्यवस्था तसेच दरमहा एक हजार रुपयांचे विद्यावेतन डब्ल्यूसीएलकडून देण्यात येणार आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग अधिक सुलभ झाला आहे.

कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत सीएसआर निधीतून डब्ल्यूसीएलने नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ तसेच मध्य प्रदेशातील छिंदवाडा व बैतूल जिल्ह्यांत ही परीक्षा आयोजित केली होती. या स्पर्धात्मक प्रक्रियेत महात्मा फुले विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर, सचिव डॉ. यादव राऊत, मुख्याध्यापक प्रमोद देशमुख, पर्यवेक्षक राणे तसेच सर्व शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## रस्त्यांची दुरवस्था लपविली?; बांधकाम विभागाने केली जिल्हाधिका-यांची दिशाभूल

प्रतिनिधी ६ जुलै

**झरी जामणी :** वणी-घोन्सा व मुकूटबन (राज्य मार्ग क्र. ३१४ व ३१५) या मार्गावरील रस्त्यांची दुरवस्था आणि पुलांवरील सुरक्षेच्या त्रुटींमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. रस्त्यावरील मोठे खड्डे आणि संरक्षण कठड्यांचा अभाव यामुळे वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना वस्तुस्थितीपेक्षा वेगळी माहिती दिल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे.



वणी-घोन्सा मार्गावरील निर्गुडा नदी पुलासमोरील रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. तसेच पुरड येथील विदर्भ नदीवरील पुलाजवळ आणि नेरड व खडकी येथील नाल्यांवरील पुलांवरही रस्ता उखडला असून, या पुलांवर संरक्षण कठडे नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः पावसाळ्यात या मार्गावरून प्रवास करणे अधिक धोकादायक बनल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिकांच्या मते, मार्गाची स्थिती समाधानकारक असल्याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याने प्रत्यक्ष परिस्थितीची त्यांना कल्पना नसल्याचा आरोप होत आहे. मात्र, वास्तवात अनेक ठिकाणी रस्ता खराब झाला असून वाहनचालक, शालेय विद्यार्थी, शेतकरी आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या मार्गावरून दररोज हजाराहून अधिक चारचाकी व अवजड वाहनांची वाहतूक होत असल्याने सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर ठरत आहे.

या पार्श्वभूमीवर वणीचे उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांनी संबंधित मार्गाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून सार्वजनिक बांधकाम विभागाला आवश्यक निर्देश द्यावेत, निर्गुडा नदी पुलासमोरील खड्डे त्वरित बुजवावेत, तसेच पुरड, नेरड आणि खडकी येथील पुलांवर संरक्षण कठडे उभारावेत, अशी मागणी भाजपचे दिनकर पावडे यांनी केली आहे. तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी त्यांनी केली आहे. पावसाळ्यामुळे या मार्गावरील धोके आणखी वाढण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## पाच शाळांच्या परिसरात घाणीचे साम्राज्य

### सांडपाण्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी ६ जुलै

**आर्णी :** शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील पाच शाळांच्या परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य पसरल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. देशी दारू दुकानातून सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे दुर्गंधी पसरत असून संबंधित दुकानदारावर कारवाई करावी आणि परिसराची नियमित स्वच्छता करावी, अशी मागणी काँग्रेसचे नगरसेवक शफी रज्जाक मलनस यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी नगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. ३० जूनपासून शाळा नियमित सुरू झाल्यानंतर या परिसरात भारती शाळा, प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १, बाबा कम्बलपोष उर्दू शाळा, सनराईज शाळा आणि साईश्वरी शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



मात्र, परिसरात मोठ्या प्रमाणात घाण साचली असून, एका देशी दारू दुकानातील सांडपाणी आणि मुतारीचे पाणी थेट साईश्वरी शाळेच्या प्रवेशद्वारासमोरील मोकळ्या जागेत सोडले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

शैक्षणिक परिसरात अस्वच्छतेची समस्या गंभीर बनली असून पालकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून नगर परिषद प्रशासनाने परिसराची दररोज साफसफाई करावी, तसेच संबंधित देशी दारू दुकानदारास नोटीस बजावून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेवक मलनस यांनी केली आहे.

प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास या प्रश्नावर आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिक नागरिकांकडून दिला जात आहे.

५

# सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. ६ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पावसाचा धुमाकूळ

**अमरावती:** निसर्गाचे वरदान असलेला पाऊस जेव्हा रौद्ररूप धारण करतो, तेव्हा त्याला 'पावसाचा धुमाकूळ' म्हणतात. उन्हाळ्याच्या काहिलीनंतर येणाऱ्या पावसाची आपण आतुरतेने वाट पाहत असतो, पण काही वेळा हाच पाऊस संपूर्ण जनजीवन विस्कळीत करून टाकतो. मुसळधार आणि संततधार पावसामुळे शहरांपासून ते गावांपर्यंत सगळीकडे हाहाकार माजतो. जेव्हा पाऊस आपला धुमाकूळ सुरू करतो, तेव्हा नदी-नाले ओसंडून वाहू लागतात. रस्त्यांना नद्यांचे स्वरूप येते आणि सखल भागांत पाणी साचल्यामुळे वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. रेल्वे आणि विमान सेवांवर याचा मोठा परिणाम होतो. चाकरमान्यांचे हाल होतात आणि कामावर जाणाऱ्या लोकांची तारांबळ उडते. गावाकडची परिस्थिती तर अधिकच गंभीर होते. शेतात पाणी साचल्यामुळे हाताशी आलेली पिके वाहून जातात किंवा सडून नष्ट होतात. यामुळे शेतकऱ्यांचे कधीही न भरून निघणारे नुकसान होते. जुनी घरे, भिंती कोसळतात आणि अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या दुर्घटना घडतात.

# भातकुली येथील न्यायालयीन इमारतीकरीता आ. रवि राणा यांच्या प्रयत्नातून 40 कोटी रूपये मंजूर

## अनेक वर्षांपासून भाड्याच्या इमारतीत सुरू असलेल्या न्यायालयाला मिळणार अत्याधुनिक स्वतंत्र न्यायालयीन संकुल; नागरिक, वकील आणि पक्षकारांची होणार मोठी सोय

प्रतिनिधी ६ जुलै

**अमरावती :** भातकुली तालुक्यासाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी असून, भातकुली येथील न्यायालयाच्या स्वतंत्र इमारतीच्या बांधकामासाठी तब्बल ४० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आमदार रवि राणा यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे या कामाला अखेर मंजुरी मिळाली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून भातकुली येथील न्यायालय भाड्याच्या इमारतीत कार्यरत असल्याने न्यायव्यवस्थेच्या कामकाजात अनेक अडचणी निर्माण होत होत्या. न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक जागेचा अभाव, वकील, पक्षकार आणि सर्वसामान्य नागरिकांना होणारा त्रास तसेच आधुनिक सुविधांचा अभाव यामुळे स्वतंत्र न्यायालयीन इमारतीची मागणी सातत्याने होत होती.

या पार्श्वभूमीवर आमदार रवि राणा यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करून हा विषय शासनाच्या निदर्शनास आणला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत भातकुली येथे आधुनिक सुविधा असलेल्या स्वतंत्र



न्यायालयीन इमारतीच्या उभारणीसाठी ४० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे.

प्रस्तावित न्यायालयीन इमारतीमध्ये न्यायालयीन कक्ष, न्यायाधीशांचे दालन, वकिलांसाठी स्वतंत्र सुविधा, अभिलेख कक्ष, प्रतीक्षागृह, प्रशासकीय कार्यालये, वाहनतळ तसेच नागरिकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे न्यायालयीन कामकाज अधिक सुलभ, गतिमान आणि प्रभावी होण्यास मदत होईल.

या प्रकल्पामुळे भातकुली तालुक्यातील हजारो नागरिकांना न्यायालयीन कामांसाठी अधिक चांगल्या सुविधा मिळणार असून, वकील, कर्मचारी आणि पक्षकारांनाही आधुनिक व प्रशस्त इमारतीचा लाभ होणार आहे. न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने हा प्रकल्प भातकुली तालुक्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

भातकुली तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, क्रीडा आणि न्यायव्यवस्था या सर्व क्षेत्रांत विकासकामे करण्याचा आमदार रवि राणा यांचा प्रयत्न सातत्याने सुरू असून, न्यायालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी मिळालेली मंजुरी हा त्या विकासदृष्टीचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

या निर्णयाबद्दल भातकुली तालुक्यातील नागरिक, विधिज्ञ, सामाजिक संस्था तसेच विविध संघटनांनी समाधान व्यक्त करत आमदार रवि राणा यांचे आभार मानले आहेत.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून परिवर्तन पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ

## ◆ पुष्पहार अर्पण, प्रचाराचे नारळ फोडले

प्रतिनिधी ६ जुलै

**दर्यापूर :** दर्यापूर वकील संघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिवर्तन पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ आज (दि. ५ जुलै) सकाळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. यावेळी पॅनलच्या सर्व उमेदवारांनी एकजुटीने विजयाचा निर्धार व्यक्त केला. परिवर्तन पॅनलकडून अध्यक्षपदासाठी ॲड. प्रदीप शेळके, उपाध्यक्षपदासाठी ॲड. देवानंद पर्वतकर, सचिवपदासाठी ॲड. अनुराधा गोमासे, सहसचिवपदासाठी ॲड. लीना गहरवाल तसेच कोषाध्यक्षपदासाठी ॲड. वैभव इंगळे हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर ॲड. संतोष धर्माधिकारी, ॲड.



जगदीश विल्हेकर, ॲड. दिलीप अग्रवाल, ॲड. उषा अग्रवाल , ॲड. मुकुंद नळकांडे, ॲड. निशिकांत पाखरे आणि ॲड. विद्यासागर वानखडे यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवली जात आहे. प्रचार शुभारंभ प्रसंगी ॲड. नरेंद्र पवार, ॲड. नंदकिशोर रायकवार, ॲड. सचिन आठवले, ॲड. हर्षवर्धन कोलखेडे, ॲड. स्वप्निल बारब्दे, ॲड. संदीप मानकर, ॲड. रितेश गवई, ॲड. सौरभ दिघडे, ॲड. सदानंद जाधव , यांच्यासह अनेक वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परिवर्तन पॅनलच्या उमेदवारांनी वकील संघाच्या सर्वांगीण विकासासाठी, पारदर्शक कारभारासाठी आणि सर्व सदस्यांच्या हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व देण्याचा संकल्प व्यक्त करत मतदारांकडे पाठिंबा व सहकार्याचे आवाहन केले आहे.

# अवघ्या दोन तासात खुनाच्या गुन्हातील तीन आरोपी ताब्यात

प्रतिनिधी ६ जुलै

**अमरावती :** अमरावती शहर गुन्हे शाखे कडुन अवघ्या दोन तासाचे आत खूनाच्या गुन्हातील तीन आरोपी ताब्यात घेतले आहे.

दिनांक ४ जुलै रोजी रात्री ११.३० वा. चे सुमारास पोलीस स्टेशन गाडगे नगर हददीमध्ये विद्याभारती कॉलेज जवळ एक इसमास धारदार शस्त्राने भोकसुन खून झाल्याबाबतची माहीती प्राप्त झाल्याने पोलीस आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ अधिकारी यानी तात्काळ घटनास्थळावर भेट दिली

असता मृतक जायेद हुसैन खान वय २८ वर्ष रा. पाकीजा कॉलनी अमरावती याला धारदार शस्त्राने मारून ठार केल्याची प्राथमीक माहीती प्राप्त झाली होती.

सदर गुन्हाचे घटनास्थळावर तात्काळ पोनि अतुल वर, पोनि दिनेश दहातोडे गुन्हे शाखा यांनी स्टाफ सह भेट देवुन गुन्हयाबाबत सविस्तर माहीती घेतली असता मृतक व आरोपी यांच्या मध्ये कोणत्यातरी कारणावरून भांडण झाल्याची प्राथमिक माहीती मिळाली. गुन्हयातील आरोपी बाबत कोणतीही माहीती नसताना गोपनिय माहीतीच्या आधारे तात्काळ आरोपी निष्पन्न करून आरोपी शेख इम्रान शेख महमुद उर्फ गोलु कुरेशी वय ३० वर्ष रा. कलाम चौक, कुरेशी पुरा यवतमाळ ह. मु. यास्मीन नगर अमरावती, शेख समीर शेख जुम्मन वय ३२ वर्ष वर्ष रा. चिलम छावणी अमरावती, शेख अमीन शेख जब्बार वय ३४ वर्ष रा. राहुल नगर अमरावती यांच्या चारचाकी वाहनाचा जवळ पास एक तास अमरावती शहरामधील रस्त्यांवर थराराक पणे पाठलाग करून आरोपी हे अमरावती शहरातुन पळून जाण्याचा प्रयत्न करीत असतांना आरोपींना बडनेरा वाय पॉइंट येथून त्यांचे चारचाकी वाहनासह ताब्यात घेतले त्याचे कडे गुन्हा संबधाने प्राथमीक तपास केला असता आरोपीतांचे व मृतक यांच्या मध्ये तात्कालीक कारनावरून भांडन होवून आरोपीतांनी मृतक याला धारदार चाकूने मारून खून केल्याचे सांगीतले आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव शेख इम्रान शेख महमुद उर्फ गोलु कुरेशी वय ३० वर्ष रा. कलाम चौक, कुरेशी पुरा यवतमाळ ह.मु. यास्मीन नगर अमरावती, शेख समीर शेख जुम्मन वय ३२ वर्ष वर्ष रा. चिलम छावणी अमरावती, शेख अमीन शेख जब्बार वय ३४ वर्ष रा. राहुल नगर अमरावती असे आहे. वर नमुद आरोपीतां पैकी आरोपी नामे शेख इम्रान शेख महमुद उर्फ गोलु कुरेशी वय ३० वर्ष रा. यवतमाळ याचेवर यापुर्वी यवतमाळ शहरातील खुनाचा गुन्हा दाखल असुन तो बरेच वर्ष मध्यवर्ती कारागृहामध्ये शिक्षा भोगुन आल्याबाबत प्राथमिक माहीती प्राप्त झाली आहे. त्याबाबत सविस्तर माहीती प्राप्त करण्यात येत आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओलांयांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

# पो.स्टे. गाडगेनगर येथील गुन्ह्यातील दुचाकी चोर ताब्यात

प्रतिनिधी ६ जुलै

**अमरावती :** गाडगेनगर येथील गुन्हयातील दुचाकी चोर ताब्यात घेतला असून वाहन जप्त करण्यात आले आहे.

पो.स्टे. गाडगेनगर येथे दिनांक ०४/०२/२०२६ रोजी फिर्यादी उमेश बाबुलाल जाधव, नवसारी, श्रध्दा कॉलनी, अमरावती यांनी तक्रार दिली की, ते जिल्हा स्त्री रुग्णालयाचे बाजूला, जिल्हा प्रशिक्षण केंन्द्र येथे गेले असता त्यांनी आपले दुचाकी वाहन हिरो होन्डा कंपनीची स्प्लेंडर प्लस ही जिल्हा प्रशिक्षण केन्द्रासमोर लॉक करुन, उभी करुन आपले कामाला गेले व परत आले तेव्हा त्यांची हिरो होन्डा स्प्लेंडर प्लस गाडी उभी केलेल्या जागी दिसून आली नाही. आजू बाजूला शोध घेतला



असता मिळून आली नाही. वरून सदर गाडी ही कोणीतरी अज्ञात व्यक्तीने चोरून नेली.

सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा अमरावती शहर करीत असतांना गुप्त बातमीदाराकडे माहिती मिळाली की, हैदरपुरा येथे राहणारा एक ईसम हा हिरो होन्डा स्प्लेंडर प्लस गाडी विकण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा खात्रीलायक गोपनिय माहीतीवरुन सदर इसमास ताब्यात घेवून सदर गाडी बाबत विचारपूस केली असता त्यानेच सदर गुन्हयातील दुचाकी चोरी केल्याची कबुली दिल्याने त्याचे ताब्यातून गुन्हयात चोरीस गेलेले दुचाकी वाहन हिरो होन्डा कंपनीची स्प्लेंडर प्लस ही हस्तगत करण्यात आली. पुढील तपासकामी आरोपी व त्याचे जवळून हस्तगत करण्यात आलेली दुचाकी पो.स्टे. गाडगेनगर यांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी चे नाव - वसीम खान बब्बू खान, वय ३९ वर्षे, रा. हैदरपुरा, अमरावती जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचे वर्णन - कि. अंदाजे १५,०००/-रु. एक निळ्या रंगाचा पट्टा असलेली काळ्या रंगाची हिरो होन्डा कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटार सायकल जिचा चेचिस क. ॅर्थ्ठ १०ॅण०३१९८, इंजिन नंबर ॅ१०उॅण०७१४२ सदरची कारवाई पोलीस आयुक्त, राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके, प्रांजली सोनावणे, पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), मा. सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) कैलास फुंडकर तसेच सहायक पोलीस आयुक्त, (गाडगेनगर विभाग) निलेश ब्राम्हणे यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. दिनेश दहातोंडे सा., अमरावती शहर यांनी केलेली आहे.

# मोदी सरकारच्या काळात महिला सक्षमीकरणाला नवी दिशा; विजया रहाटकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी ६ जुलै

**अमरावती:** राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी शुक्रवारी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या अमरावती येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी डॉ. अनिल बोंडे व विश्व मांगल्य सभेच्या विदर्भ संपर्क प्रमुख डॉ. वसुधा बोंडे यांनी पुष्पगुच्छ, विश्व मांगल्य सभेचा गौरव ग्रंथ देऊन त्यांचे उत्साहात स्वागत केले.

यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान ठपंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने महिला सक्षमीकरणाला

## खा.डॉ.अनिल बोंडे यांच्या निवासस्थानी भेट



सर्वोच्च प्राधान्य दिले असून, महिलांच्या सुरक्षितता, स्वावलंबन, शिक्षण, आर्थिक सबलीकरण आणि निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी अनेक प्रभावी योजना व धोरणे राबविली आहेत. त्यामुळे देशातील महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत आहे, ज्याद्वारे प्रभावी महिला सक्षमीकरण होतं असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. यावेळी महिला सक्षमीकरण, सामाजिक प्रश्न तसेच समाजहिताच्या विविध विषयांवरही सविस्तर चर्चा झाली.

# काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे असलेले स्वप्न लोकशाही वाचविण्याच्या काँग्रेसच्या निर्णायक लढ्याला बळ

प्रतिनिधी ६ जुलै

## ◆ अमरावती येथे BLA-2 प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात

**अमरावती :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या Specialed Intensive Revision (SIR) अभियानाच्या अनुषंगाने तसेच लोकशाही व संविधान वाचविण्याच्या काँग्रेस पक्षाच्या निर्णायक लढ्याचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून आज, शनिवार दिनांक ४ जुलै २०२६ रोजी काँग्रेस भवन, अमरावती येथे BLA-2 (Boothed Level Agent-2) प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडला.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने अक्षय राऊत व निखिल रांजणकर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून अमरावती विधानसभा व तिवसा विधानसभा मतदारसंघातील सर्व नियुक्त BLA-2 यांना सविस्तर प्रशिक्षण दिले.



प्रशिक्षणादरम्यान Specialed Intensive Revision (SIR) प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याची माहिती देण्यात आली. मतदार यादीतील नव्या मतदारांची नोंदणी, पात्र मतदारांची नावे वगळली जाणार नाहीत याची दक्षता, चुकीच्या नोंदी दुरुस्त करणे, स्थलांतरित मतदारांच्या नोंदी अद्ययावत करणे, आवश्यक अर्ज व कागदपत्रांची पूर्तता, प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदार यादीचे बारकाईने परीक्षण तसेच ँध्थ् यांच्या कामकाजावर लोकशाही पद्धतीने प्रभावी समन्वय ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शकांनी स्पष्ट केले की, मतदार यादी ही लोकशाहीचा पाया आहे. एका पात्र मतदाराचेही नाव अन्यायकारक पद्धतीने वगळले जाणार नाही, यासाठी काँग्रेस पक्ष प्रत्येक बूथवर सज्ज असून BLA-2 ही या संपूर्ण प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची कडी आहे. प्रत्येक बूथवर मतदारांच्या हक्कांचे संरक्षण करणे, कोणत्याही प्रकारच्या त्रुटी तात्काळ निदर्शनास आणणे आणि आवश्यकतेनुसार निवडणूक आयोगाकडे पाठपुरावा करणे, ही प्रत्येक BLA-2 ची जबाबदारी असल्याचे सांगण्यात आले.

सदर कार्यक्रमाला माजी पालकमंत्री यशोमतीताई ठाकूर, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत, मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश सचिव हाजी नजीर खान बी. के., प्रदेश सचिव आसिफ तवक्कल, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष मुक्कद्दर पठाण, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, नगरसेवक अनिल अग्रवाल यांच्यासह अमरावती व तिवसा विधानसभा मतदारसंघातील BLA-2 उपस्थित होते. तसेच अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, ऱ्एळघ्, अनुसूचित जाती-जमाती विभाग, अल्पसंख्यांक विभाग, सेवादल, शिक्षक सेल, विधी सेल, व्यापारी सेल, पदवीधर सेल तसेच काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाढत्या शहरीकरणांसाठी 'मित्रा' मार्फत नगर विकासाचे नवीन धोरण ठरविण्याची गरज- आ. संजय खोडके

## ◆ छोट्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक अडचणी संदर्भात आ. संजय खोडके यांची दीर्घकालीन चर्चा

प्रतिनिधी ६ जुलै

**अमरावती :** राज्यात शहरीकरण झपाट्याने वाढत असून नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने मूलभूत सुविधांची कामे करणे अत्यंत निकडीचे झाले आहे.

राज्यातील 'ड' वर्ग महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींची आर्थिक परिस्थिती गंभीर असल्याने त्या स्वतःच्या आर्थिक उत्पन्नातून नागरी भागात पायाभूत सुविधांची पूर्तता करणे अशक्य आहे. अशा परिस्थितीत छोट्या स्थानिक स्वराज संस्थांना शासनाच्या बजेट मधून अथवा जिल्हा नियोजनातून अधिकाधिक निधी मिळण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाच्या धोरणांमध्ये आमुलाग्र बदल करून नवीन धोरण ठरविण्याची आवश्यकता असल्याचे मत आ. संजय खोडके यांनी विधानपरिषदेतून मांडले आहे.

विधानपरिषदेमध्ये नियम २६०च्या प्रस्तावावर चर्चा करतांना आमदार - संजय खोडके यांनी नगर विकास संदर्भात बोलतांना राज्यातील 'ड' वर्ग महापालिका तसेच नगरपालिका व नगरपंचायतींना शासनाकडून कुठलाही निधी मिळत नसल्याने स्व-उत्पन्नातून विकास कामे करतांना अडचणी निर्माण झाल्या असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नगरोत्थान योजनेच्या अनुदानातून कामे करायची असल्यास ठ डठ वर्ग महानगर पालिकांना २५ टक्के भार उचलावा लागणार असल्याचे नियम आहे. मात्र त्यांची आर्थिक अवस्था बिकट असतांना त्या इतका २५ टक्के भार उचलू शकत नसल्याने ज्या काही चांगल्या ठअठ वर्ग महापालिका आहेत किंवा शासनाच्या पीएमआरडीए, एमएमआयडीए, सिडको सारख्या योजनेचा हा निधी मिळतो. त्यामुळे डठ वर्ग महानगर पालिकांना नगरोत्थान मधील २५ टक्के वाटा कमी करून ५ टक्केवर आणणे आवश्यक आहे. तेव्हाच ठडठवर्गमहापालिका , छोट्या नगर पालिका अशा ठिकाणी नगरोत्थानच्या योजना राबविणे शक्य होणार असल्याचे सुद्धा आ. संजय खोडके यांनी स्पष्ट करून छोट्या स्थानिक स्वराज संस्थांच्या आर्थिक अडचणींबाबत सभागृहाचे लक्ष वेधले.अमरावती महानगर पालिका क्षेत्रात संदर्भात उदाहरण देतांना आ. संजय खोडके यांनी अधोरेखित केले कि, आज ६० टक्के शहरीकरण वाढले आहे. ग्रामीण भागातून लोक शहराकडे येत असतांना त्यांना सर्व पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक असतांना निधी अभावी त्यांना सुविधा पुरविणे कठीण आहे. अमरावती महानगर पालिकेला वित्त आयोगातून उपलब्ध होणारे अनुदान हे स्वच्छता कामे व इतर कामांवर खर्च होतात. अमरावतीमध्ये औद्योगिकरण नसल्याने टॅक्स मधूनही उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे महापालिकेला फक्त जिल्हा नियोजन मधून मिळणारा निधी आणि नगरोत्थान योजनेचे अनुदानावर अवलंबून राहावं लागत आहे. आणि बजेट असो कि जिल्हा नियोजन योजना असो सर्वाधिक निधी हा जिल्हा परिषद अंतर्गत कामे व ग्रामीण भागाकडे जात असल्याने पश्चिम विदर्भाचे



मुख्यालय असलेल्या अमरावती शहरीभागात विकासाचा मोठा अनुशेष निर्माण झाला आहे.

अशा परिस्थितीत ठडठ वर्ग महानगर पालिका व छोट्या -नगरपालिका - नगर पंचायतीना शासनाच्या बजेटमधून तसेच जिल्हा नियोजनातून अधिकाधिक निधी मिळण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाने सद्याचे धोरण बदलवून एक नवीन आराखडा व स्वतंत्र नवीन धोरण आखण्याची गरज आहे. आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आणि शाश्वत आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी शासनाने नियोजन विभागामार्फत ठ मित्राठ सारखी संस्था निर्माण केली आहे. त्या मित्रा संस्थेकडे हा विषय देऊन राज्यातील वाढत्या नवीन शहरीकरणाच्या संदर्भात पायाभूत सुविधांची मुबलक पूर्तता करण्यासाठी राज्य शासनाच्या बजेटमधून अथवा जिल्हा नियोजनातून नव्या शहरीकरणाच्या विकासासाठी अधिकाधिक निधी कसा उपलब्ध करता येईल. त्यासंदर्भात 'मित्रा' मार्फत नगर विकास विभागाचे एक सुयोग्य नवीन धोरण ठरविण्याची आवश्यकता असल्याचे मत आ. संजय खोडके यांनी व्यक्त केले. दरम्यान अधिवेशनामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबधित विषयावर आ.संजय खोडके यांनी अमरावती रेल्वे उड्डाणपूल पुनर्निर्मिती प्रकल्पास गती देण्याची मागणी केली. अमरावतीची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुलभ करण्याच्या दृष्टीने हा पूल तातडीने पूर्णत्वास आणणे आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग मागील सहा महिन्यापासून याबाबत तयारी करत आहे. मध्यंतरी महोदयांनी महारेल मंडळ स्थापन करून राज्यातील रेल्वे ओव्हरब्रिज संदर्भात सर्व कामे महारेल मंडळाच्या माध्यमातून पूर्णत्वास आणण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महारेल मंडळाकडून सर्व प्रक्रिया नव्याने पूर्ण करतांना आणखी बराच विलंब लागणार आहे. म्हणून अमरावती रेल्वे उड्डाणपुल पुर्नबांधकाम संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेला आराखडा कायम ठेवून हा सर्व आराखडा जसाच्या तसा महारेल मंडळाकडे पाठविल्यास लगेच टेंडर प्रक्रिया होऊन हा पूल १ वर्षात पूर्ण होईल. या संदर्भातही निर्णय घेण्यासाठी महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन व सार्वजनिक बांधकाम विभाग याचे अधिकारीसोबत याच अधिवेशनादरम्यान बैठक घेऊन अमरावतीच्या रेल्वे उड्डाणपुलाचे कामास गती देण्याची मागणी केली.

शासनाकडे पायाभूत सुविधांचे प्रस्ताव प्रलंबित असून त्यात अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौकापर्यंत उड्डाणपुलं साकारण्याचे काम प्रस्तावित आहे. त्यामुळे आगामी डिसेंबरच्या विधिमंडळ अधिवेशनापर्यंत पायाभूत सुविधांच्या कामाचे प्रस्ताव निकाली काढून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी सुद्धा आमदार संजय खोडके यांनी सभागृहातून केली आहे. तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाने नागपूर अधिवेशनात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर शहरी भागाकरिता मुख्यमंत्री शहरी सडक योजना जाहीर केली. मात्र आजपर्यंत या योजनेवर निधीची कुठलीही तरतूद करण्यात आली नसल्याने ही योजना पुढे जाऊ शकली नाही. शहरी भागात रस्ते निर्मितीची कामे ही पायाभूत सुविधांच्या योजनांमधून करावी लागत आहे.

# अन्न व औषध प्रशासन अधिकारी...
# म्हणे, कमी आहे मणुष्य बळ, मग थांबवा वसुलीचा छळ !



तुकाराम मुंढे साहेब, भ्रष्टअधिकाऱ्यांकडे .द्या लक्ष, व्हा दक्ष



तुकाराम मुंढे यांच्या,
कारवाईची धास्ती, उतरली मस्ती,
मात्र वाशीमच्या अधिकाऱ्यांच्या,
कारवाई कमी, वसुली जास्ती !
दिखावा म्हणून कारवाया डमी, मॅनेजची हमी, अन्न व औषध प्रशासन विभाग निकामी

तुकाराम मुंढे साहेबांचा...
शिस्त, कडक नियम व कायद्या, भ्रष्टअधिकाऱ्यांचा वसुलीचा फायदा !
*मोठ्या माफियांना सूट, छोट्या दुकानदाराकडून लूट * छोटे - मोठे अशी फूट

तुकाराम मुंढे साहेब...
औषध प्रशासनाचा मोरक्या, वसुलीसाठी घालतो गिरक्या !
* एकही ठोस कारवाई नाही, फक्त वसुलीची घाई...

बातम्या खास, दखल हमखास, सिटी न्युज सुपरफास्ट...
अन्न व औषध प्रशासनाला आली जाग,
कारवाईसाठी भागम भाग !
वाशीममध्ये कारवाईचा धडाका; हॉटेल्सचे परवाने निलंबित, दोघांना सुधारणा नो...

## एकीकडे दिखावा म्हणून तातपूर्ती कारवाई, दुसरीकडे दलालामार्फत वसुलीची घाई

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अन्न व प्रशासन विभागाची वाशीम जिल्ह्यात एकही कारवाई नसल्याचे व निव्वळ वसुली सुरू असल्याची वृत्तमालिका सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरल्यानंतर वसुलीसाठी जागृत असलेल्या व कारवाईसाठी निद्रावस्थेत असलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागाला जाग आली असून कारवाईसाठी आता भागम भाग सुरू केली आहे. मात्र, दिखावा म्हणून तातपूर्ती कारवाई म्हणून दुसरीकडे मिडीकल असोसीएशनच्या दलालामार्फत प्रत्येक मेडीकलकडून थेट वसुली करून छळ सुरू आहे. वरवर दाखविण्याकरिता मणुष्य बळ कमी असल्याचरुा वल्गना भ्रष्टअधिकारी करीत आहेत.

अन्न व औषध प्रशासनाने वाशीम जिल्ह्यातील काही व्हॉटेल व दुध डेरीवर तपासणी करून कारवाई केली. या कारवाईतही भेदभाव दिसून येत आहे. अनेक मोठे माशे सोडून छोट्या माशांवरच कारवाई होतांना दिसत आहे. अनेक मोठ्या दुध डेअरी भेसळ करून दुध जन्य पदार्थ विकत आहेत. अनेक वर्षापासून मोठ्या दुध डेअरीवर अद्यापही कारवाई किंवा तपासणी झाली नाही. तर बेकरी व्यवसायही अवैध रित्या सुरू असून अनेक बेकरींची तपासणी करणे गरजेचे आहे.

गुटख्यावरही वाशीम जिल्ह्यात ठोस कारवाई नाही. भ्रष्ट अधिकारी मणुष्य बळी कमी असल्याच्या वल्गना करीत आहेत. मात्र काही मेडीकल संघटनेचे पदाधिकारी तिनही जिल्ह्यात अकोला, वाशीम, बुलढाणा जिल्ह्यात थेट मेडीकल वाल्यांचा अधिकाऱ्यांच्या नावाने छळ करून वसुली करीत असल्याचे दिसून येत आहे. हे दलाल अधिकाऱ्यांचे भागिदार असून अधिकारी व दलालांच्या फोन कॉलचे डिटेल काढल्यास सत्य समोर येईल.



कारण अद्यापपर्यंतही वाशीम, अकोला, बुलढाणा जिल्ह्यात या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी एकही कारवाही न करता निवळ वसुलीचा धंदा लावला आहे.

**गुटखा बंदीच्या नावाखाली वसुलीची संधी...**

राज्यात गुटखा बंदी आहे. मात्र, या भ्रष्टधिकाऱ्यांनी मुंढे साहेब येण्याच्या अगोदरच व नंतरही कधीही ठोस कारवाई केल्याचे उघड झाले नाही. उलट पोलिसांनीच कारवाई करून गुटखा या अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिला होता. मात्र या भ्रष्टधिकाऱ्यांनीही गुटख्याची विल्हेवाट न लावता, गुटखा नष्ट न करता तोच गुटखा देवाण घेवाण करून माफीया मार्फत विक्री केल्याचे किस्से ही आहेत.

आयुक्त तुकाराम मुंढे हे शिस्त, कडक, नियम व कायद्यासाठी प्रसिध्द आहेत. ज्या विभागात गेले त्या विभागात ते कायद्याने काम करून सर्वसामान्यांचा फायदा करतात मात्र, अकोला - वाशीम जिल्ह्यात त्यांच्या याच गोष्टीचा फायदा घेत भ्रष्टअधिकाऱ्यांनी कारवाईच्या नावाखाली छोट्या दुकानदारांकडून लूट सुरू केली आहे. यासाठी दलालही नेमले आहेत. अकोला - वाशीम जिल्ह्यात अन्न व प्रशासन विभागाने एकही ठोस मोठी कारवाई न करता निव्वळ वसुलीचाच धंदा सुरू केला आहे. राज्यभरातील तुकाराम मुंढे यांच्या कारवायामुळे माफियांनी धास्ती घेतली असून अनेकांची मस्ती उतरली आहे. याच गोष्टीचा फायदा घेत औषध प्रशासन विभागाचा मोरक्या दलालामार्फत वसुलीसाठी बुलढाणा व वाशीम जिल्ह्यात गिरक्या घालत आहे.

त्यामुळे मुंढे साहेबांनी भ्रष्टधिकाऱ्यांवरही कारवाई करणे गरजेचे आहे. त्यांच्या कार्याचा लेखाजोखा घेवून सत्य काय आहे ते पाहावे. या भ्रष्टधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

## थोडक्यात

### आठवडी बाजारत घाणीचे साम्राज्य !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मंगरूळपीर नगरपरिषद चा कारभार प्रभाऱ्याच्या खांद्यावर असल्यामुळे शहरातील विकास कामाला खिळ बसली आहे. तसेच येथील आठवडी बाजारात व्यवसायिकांना कुठल्याही प्रकारची सुविधा नसून चिखल पाण्यात दुकाने थाटून व्यवसाय करावा लागतो व शहरातील व खेड्यापाड्यातील नागरिकांना सुद्धा चिखलातूनच गृह उपयोगी वस्तू घ्यावे लागतात नगरपरिषद ला आठवडी बाजारा मधून व इतर शहरातील लघु व्यवसाय का पासून मोठ्या प्रमाणात कर मिळतो परंतु आठवडी बाजार व इतर ठिकाणी कुठल्याही प्रकारची सुविधा नसल्यामुळे आठवडी बाजारात खेड्यापाड्यातून येणाऱ्या नागरिकांना चिखला पाण्यातून जात असताना त्रास सोसावा लागत आहे. तसेच शहरामध्ये हॉटेल्स खानावळ व इतर छोट्या-मोठ्या दुकानदारांनी त्यांच्या दुकानामागे कचऱ्याचे ढिगारे करून ठेवल्या मुळे सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येणार नाही तरी नगरपरिषद नी याकडे गांभीर्याने लक्ष देणे सुद्धा गरजेचे आहे.

व्यवसायकाच्या दुकानामागे हॉटेल मागे जो काही कचरा पडतो त्याची सुद्धा नगरपरिषद ने विले वाट लावून शहराला रोगराई पासून वाचवावे. तसेच आठवडी बाजारामध्ये ज्या ज्या ठिकाणी पाणी जमा होऊन चिखल होतो त्या ठिकाणी तात्पुरती रस्त्याचे दुरुस्ती करून लघु व्यवसायिक व नागरिकांना दिलासा द्यावा. शहरामध्ये अनेक ठिकाणी भूमिपूजन झाले विकासाचा गाजावाजा झाला परंतु रस्त्याच्या अवस्था जैसे थे असल्यामुळे बस स्टँड लगत असलेल्या बायपास रोड ला गेल्या अनेक वर्षांपासून ग्रहण लागले असून दुरुस्ती नसल्यामुळे मोठमोठे खड्डे पडून महत्त्वाचा वाहतुकीचा रस्ता असून सुद्धा याकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष होत आहे.

## नोकरीच्या आमिषाने बनावट नियुक्ती, तिघांना लाखांच्या फसवणूकीची युक्ती !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सिव्हिल हॉस्पिटलमध्ये वॉर्ड अटेंडंट पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत बनावट नियुक्ती आदेश देऊन प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपये उकळल्याप्रकरणी दोन युवकांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल करत सखोल चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

शिरसाळा (ता. मालेगाव) येथील वैभव प्रभाकर पडघान आणि आकाश राजेश पट्टेबहादूर यांनी स्वतंत्र निवेदनाद्वारे पोलीस अधीक्षक, गुन्हे शाखा, वाशीम यांच्याकडे तक्रार केली आहे. तक्रारीनुसार, तांदळी बुद्रुक येथील प्रतीक प्रभाकर कांबळे याने सिव्हिल हॉस्पिटल, वाशीम येथे वॉर्ड अटेंडंट पदावर नियुक्ती करून देण्याचे आश्वासन देत बनावट नियुक्ती आदेश दिले.

त्यासाठी दोघांकडून प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपये घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा प्रकारे एकूण ३ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. या प्रकरणात वापरण्यात आलेल्या नियुक्ती आदेशांवर शासकीय शिक्के व स्वाक्षऱ्यांची बनावट कागदपत्रे वापरण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे ही फसवणूक एखाद्या मोठ्या रॅकेटमार्फत करण्यात आली असण्याची शक्यता तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. दोन्ही तक्रारदारांनी या प्रकरणाची प्रत शहर पोलीस स्टेशन, वाशीम येथेही दिली असून गुन्हे शाखेमार्फत सखोल तपास करण्याची मागणी केली आहे.

आरोपीचे मोबाईल, कॉल रेकॉर्ड्स व आर्थिक व्यवहारांची चौकशी करून अशा प्रकारे फसवणूक झालेल्या इतर पीडितांचा शोध घ्यावा आणि संपूर्ण रॅकेट उघडकीस आणून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या तक्रारीमुळे नोकरीच्या आमिषाने बनावट नियुक्ती आदेश देऊन फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश होणार का, याकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## जगण्याची कळ, महागाईची झळ !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जीवनाश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले. व महागाईची आग झपाट्याने पेटत आहे. त्यामुळे महागाईची झळ अन् जीवनाची कळ होत आहे. इंधन दरवाढीने जीवनावश्यक वस्तुचे दर गंगनाला पोहोचले आहेत. बांधकाम साहित्याच्या दरवाढीमुळे सर्व सामान्यांचे घराचे स्वप्ने अधुरेच राहत आहेत.

सध्या सणसुदीचे दिवस असून बाजारपेठेत सर्वच जीवनावश्यक वस्तु सह भाजीपाल्याचेही दर भरमसाठ वाढले आहेत. ग्राहकांची वर्दळ आहे. ग्राहकाच्या या उत्साहामुळे बाजारपेठ फुलल्या आहेत. शहरातील मोठ्या बाजारात सुवर्ण झळाळी असल्याचे चित्र दिसते. शेंगदाणे तेलाच्या दरात किलोमागे सरासरी ३० ते ४० रुपयांची वाढ झाली आहे. बाजारपेठेमध्ये गुळ, नारळ, हरभरा आणि तेलाची मोठी आवक झाली आहे. मात्र ग्राहकांना दरवाढीची झळ बसली आहे.

घर बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या भावात दुप्पट तिप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना घरबांधणे आवक्याच्या बाहेर झाले आहेत. २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे मोदी सरकारचे आश्वासन हवेतच विगळले. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तुत अचाणक वाढ झाली आहे.

## जिल्हाभर घरोघरी पडताळणीचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

'मतदार यादी जितकी अचूक आणि अद्ययावत, तितकी लोकशाही अधिक सक्षम होते. त्यामुळे विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत प्रत्येक पात्र मतदाराने सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे,' असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत असून, जिल्हाभर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देऊन मतदारांची माहिती पडताळत आहेत. गणना प्रपत्र भरून घेण्याचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून, पात्र मतदारांची माहिती अचूकपणे नोंदविण्यावर भर देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक आणि बीएलओ यांच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकारी विविध भागांना भेटी देऊन मोहिमेचा आढावा घेत असून आवश्यक सूचना देत आहेत.

नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देऊन अचूक माहिती द्यावी तसेच प्रपत्रातील माहितीची खातरजमा करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह मतदार यादी तयार करण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची असून, प्रत्येक पात्र मतदाराने यात सक्रिय सहभाग नोंदवून लोकशाही प्रक्रियेला बळकटी द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## मंगरूळपीर शहरात शिवसेनेचे रामरक्षा आंदोलन

### शेकडो शिवसैनिकांच्या उपस्थितीत महाआरती

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

अयोध्येतील राम मंदिराच्या दानपेटीतील कथित चोरी व घोटाळ्याच्या निषेधार्थ, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने राज्यभरात 'रामरक्षा आंदोलन' आणि 'महाआरती'चे आयोजन केले होते. या पार्श्वभूमीवर मंगरूळपीर शहरातील शिवसेना शहर प्रमुख (उबाठा) सचिन परळीकर यांनी ता०५ सायंकाळी ५ वाजता शहरातील राम मंदिरात महाआरतीचे आयोजन केले होते. यावेळी शेकडो शिवसैनिकांनी सहभाग घेतला होता.



प्रभू श्रीरामाच्या नावावर अमर्याद सत्ता भोगणाऱ्या भाजपच्या राजवटीतच अयोध्येतील राम मंदिराच्या दानपेटीवर दरोडा पडल्याचा घणाघाती आरोप शिवसेनेकडून करण्यात आला आहे. या प्रकारामुळे देशभरातील रामभक्तांमध्ये तीव्र संताप असून, या लुटीचा जाहीर निषेध करण्यासाठी आणि संबंधित गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी, या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन छेडण्यात आले.

यावेळी शिवसेनाप्रमुख (उबाठा) उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आव्हानानंतर मंगरूळपीर शहरातील राम मंदिरात शहर शिवसेनाप्रमुख सचिन परळीकर यांनी सपत्नीक प्रभू श्रीरामाची महाआरती केली, यावेळी शिवसेना (उबाठा) चे अर्जुन सुर्वे, भागवतराव शिंदे बंडूभाऊ वैद्य, प्रकाश अपूर्वा, महेंद्र ठाकरे, साहेबराव बेंद्रे मोहन राऊत, किशोर गावंडे, संजय कातडे, राजू मांडवगडे, देवा राठोड, पाचू रायके, दिनेश तेलंग, बाळू भाऊ ढोरे, नंदलाल जाखोटीया, उज्वल मिश्रा, आकाश भंडारे, विशाल गुप्ता, दिनकर डोंगरे, रमेश मोरे, वेदांत शर्मा, ऋषभ शर्मा, गौरव गिरीधर, गौरव बोरकर, प्रमोद भोजने, विजय मुंदडा, बाळू डावरे, शिवा भडांगे, ओम प्रकाश इंगळे, आशुतोष चरावंडे, राजेश भारस्कर यांच्या सह शेकडो शिवसैनिकांनी आयोजित महाआरती मध्ये सहभाग घेतला होता.

## सापळी-सोंडा मार्ग, दाखवितोय स्वर्ग !

### *रस्त्याची दुरवस्था * जिल्हा परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष *चिखलमय रस्त्याने ये–जा करताना अबालवृद्धांची कसरत

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

तालुक्यातील वाशीम-पुसद मार्गावर असलेल्या सापळी फाटा ते सोंडा या रस्त्याची दुरवस्था झाली आहे. पावसाळा सुरू झाल्याने 'हा' रस्ता चिखलमय झाल्याने या रस्त्याने ये-जा करताना अबालवृद्धांना दररोज तारेवरची कसरत करण्याची वेळ आली आहे. दोन्ही गावातील लोकांनी हा रस्ता दुरूस्त करण्यासाठी अथवा नविन रस्ता करून देण्याची प्रशासनाकडे अनेकवेळा मागणी केलेली आहे. परंतु जिल्हा व जिल्हा परिषद प्रशासनाने दोन्ही गावातील रस्त्यापासून त्रस्त असलेल्या लोकांच्या न्याय्य मागणीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे.

सापळी-सोंडा रस्ता जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे आहे. जवळपास १५ वर्षापुर्वी हा रस्ता पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून करण्यात आला होता. हा रस्ता झाला तेव्हा कार्यरत असलेल्या लोकप्रतिनिधींनी या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष केल्याने तत्कालीन जबाबदार अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे खिसे गरम केल्याने सापळी-सोंडा रस्त्याचे काम थातुर-मातुर पद्धतीने केल्याचा आरोप दोन्ही गावातील लोकांकडून होत आहे. सापळी हे गाव अनसिंग जि.प.गटात येते. तर सोंडा हे गाव वारला जि.प.गटात येते. दोन्ही गावाचे जि.प. व पंचायत समितीचे वेगळे सदस्य असतात. कमीत कमी आपल्या सर्कलमध्ये असलेल्या विकास कामासाठी 'त्या' सदस्यांनी एकत्र राहून प्रशासनाकडून आपल्या सर्कल मधील प्रलंबित कामासाठी आणि नविन कामासाठी वरिष्ठ अधिकारी आणि संबंधीत लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करून आपल्या सर्कलचा विकास करून घेण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याची माहिती सोंडा येथील जागरूक नागरिकांनी दिली. १५ वर्षापुर्वी पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून झालेल्या सापळी-रस्त्याची मागील दोन वर्षापासून चाळणी झाल्याने हा रस्ता सद्या चिखलमय झाला आहे. या चिखलमय रस्त्याने दररोज शेकडो दुचाकी वाहने, ऑटो, मालवाहू वाहने ये-जा करतात. परंतु ही वाहने चिखलातुन चालवतांना दररोज कसरत करण्याची वेळ आल्याची माहिती सोंडा येथील युवा सरपंच नवनाथ वाबळे यांनी दिली. सापळी-सोंडा या रस्त्याची चाळणी झाल्याने दोन्ही गावातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि रूग्णांना अनसिंग, वाशीमला येताना-जाताना अनेक संकटांना तोंड देण्याची वेळ आल्याची चर्चा आहे. वाशीमचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी आणि वाशीम जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी या दोन्ही 'सनदी' अधिकाऱ्यांनी सापळी-सोंडा रस्त्याची दुरूस्ती करण्यासह हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी मागणी सापळी, सोंडा येथील त्रस्त लोकांकडून केल्या जात आहे.



## आदिशक्ती संस्थेतर्फे काकडशीवणी येथे पुस्तक पेढीचे उद्घाटन

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

बाबासाहेब धाबेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काकडशिवनी या शाळेत आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्थेतर्फे दहावीचे १५ संच मोफत देऊन सावित्रीबाई फुले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुस्तक पेढ़ी योजनेचे उद्घाटन करण्यात आले.

मागील दहा वर्षापासून आदिशक्ती महिला बहुउद्देश्यीय संस्था तर्फे कारंजा तालुक्यातील ११ माध्यमिक विद्यालय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले योजना सुरू आहे. या योजनेअंतर्गत इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना शालेय पुस्तक उपलब्ध करून दिले जातात. दिनांक ४ जुलै रोजी बाबासाहेब धाबेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय काकडशिवनी येथे वर्ग दहावीचे १५ संच उपलब्ध करून विद्यार्थ्यांना वितरित करण्यात



आले. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन शाळेचे संस्था अध्यक्ष योगेश खोपे, प्रमुख अतिथी म्हणून आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्थेचे संचालक प्रा. निर्मलसिंह ठाकूर, उपसरपंच गणेश मालवे, गोपाल खाडे व बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय भड, संस्थेचे सचिव हरिदास गंद्रे, कोषाध्यक्ष निलेश खोपे, संचालक देविदास काळबांडे, काकडशिवानी विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक चेतन शेगावकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन बी.डब्ल्यू इचे व आभार देवानंद खानापुरे यांनी मानले. यावेळी प्रशांत वानखेडे, आशा खोपे, तळोकार मॅडम यांचे सह विद्यार्थी उपस्थित होते.

# खामगावातील सार्वजनिक स्वच्छतागृहांना कुलूप

## महिलांची गैरसोय; सफाईचा अभाव ! ■ स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय

प्रतिनिधी ६ जुलै

**खामगाव :** शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी नगरपालिकेने विविध ठिकाणी उभारलेली सार्वजनिक स्वच्छतागृहे सध्या देखभालीअभावी निष्प्रभठरत आहेत. काही स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अनेक ठिकाणी अस्वच्छता पसरली आहे. तर काही स्वच्छतागृहे बंदच राहत असल्याने विशेषतः बाजारपेठेत येणाऱ्या महिलांना गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचे 'लोकमत'ने केलेल्या पाहणीत वास्तव समोर आले आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठ तसेच गर्दीच्या भागात महिलांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. त्यानंतर नगरपालिकेने मोठा निधी खर्च करून शहरातील विविध ठिकाणी सात सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारली. या ठिकाणी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. सुरुवातीच्या काळात या सुविधेचा नागरिकांना लाभ झाला. मात्र कालांतराने स्वच्छता व देखभालीकडे दुर्लक्ष झाल्याने अनेक स्वच्छतागृहे वापरण्यायोग्य राहिलेली नाहीत.



### शहरात सात सार्वजनिक स्वच्छतागृहे

नगरपालिकेने शहरातील बाजारपेठ आणि इतर गर्दीच्या भागांत एकूण सात सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारली आहेत. महिलांसह पुरुषांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असली, तरी नियमित देखभाल आणि स्वच्छतेअभावी या सुविधांचा अपेक्षित लाभ नागरिकांना मिळत नसल्याची तक्रार आहे.

### महिलांची सर्वाधिक गैरसोय!

अनेक स्वच्छतागृहे बंद असल्याने नागरिकांची गैरसोय वाढली आहे. विशेषतः खरेदी, बँकांची कामे, शासकीय कार्यालयांतील कामकाज किंवा इतर कारणांसाठी बाजारपेठेत येणाऱ्या महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सार्वजनिक सुविधांवर लाखो रुपये खर्च करूनही त्या बंद अवस्थेत राहणे ही गंभीर बाब असून, त्या नियमित सुरू ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### नियमित देखभाल आवश्यक !

सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाश व्यवस्था, देखभाल आणि आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्यास या सुविधांचा नागरिकांना प्रभावी लाभ मिळू शकतो. स्वच्छतागृहे दिवसभर सुरू राहतील, यासाठी नगरपालिकेने ठोस नियोजन करून नियमित देखरेखीची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे

# खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशन रोडची अक्षरश: चाळण

## नागरिकांकडून तातडीच्या दुरुस्तीची मागणी

प्रतिनिधी ६ जुलै



**खामगाव :** शहरातील ग्रामीण पोलीस स्टेशनकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना विशेषतः मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका वाढला आहे.भाग्योदय कॉलनी, वामन नगर, गजानन कॉलनी ,शंकर नगर शिक्षक कॉलनी, जिया कॉलनी,आणि तायडे कॉलनी परिसरातील नागरिकांनी रस्त्याची दुरुस्ती व्हावी अशी मागणी केली आहे पावसाळ्याच्या तोंडावर रस्त्यावरील खड्डे अधिकच धोकादायक बनत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

स्थानिकांच्या मते, हा मार्ग परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून दररोज शेकडो वाहनांची ये-जा असते. मात्र रस्त्याची झालेली चाळण पाहता वाहनांचे नुकसान तर होतच आहे, शिवाय अपघाताची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे रस्त्याच्या संबंधित विभागाने तातडीने या रस्त्याची पाहणी करून खड्डे बुजवून दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी जोरदार मागणी भाग्योदय कॉलनी, गजानन कॉलनी,वामन नगर, शंकर नगर शिक्षक कॉलनी ,जिया कॉलनी,आणि तायडे कॉलनीतील नागरिकांनी केली आहे.

# उपवर्गीकरण आरक्षण जाहीर करा 17 जुलैला मातंग समाजाचा मोर्चा

प्रतिनिधी ६ जुलै

**जळगाव जामोद :** अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करून एबीसीडी आरक्षण तातडीने जाहीर करावे, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलाश खंदारे यांच्यावरील हल्ल्यातील आरोपींवर कठोर कारवाई करावी.

तसेच सोशल मीडियावर महापुरुष आणि जातीविषयी आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत, या मागण्यांसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने १७ जुलै रोजी जळगाव जामोद येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

या संदर्भात ३ जुलै रोजी सकल मातंग समाज, बुलढाणा उत्तर विभागाची बैठक पार पडली. बैठकीत राज्यभर सुरू असलेल्या अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या आंदोलनाला पाठिंबा देत १७ जुलै रोजी भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला. यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

बैठकीस ज्येष्ठ नेते बबनराव बोददे, मातंग समाज समन्वय समितीचे संस्थापक अध्यक्ष संजय बोददे, भारतीय लहुजी सेनेचे राज्याध्यक्ष वामनराव बोरसे, युवा नेते विजय सोनोने, जिल्हाध्यक्ष प्रकाश बोददे, कैलास डाखोरे, महादेवराव अडाळे, सुनील जाधव, एकनाथ सदनशिव, श्रीकृष्ण देवकुळे, गणेश पाटोळे, शेषराव बोददे, विजय हरी सोनोने, भारत पाटोळे, योगेश सोनोने, शैलेश तायडे, अजय पवार, मयूर सोनोने, जीवन रणशिंगे, विशाल डाखोरे, प्रवीण अडाळे, समाधान निकाळजे, दयाराम बोददे, उमाकांत मानकर, महादेव चंदनशिवे यांच्यासह बहुसंख्य समाजबांधव उपस्थित होते.

# रेल्वे अंडरपाससाठी सिमेंट नाली तोडली; कामात नियोजनाचा अभाव !

प्रतिनिधी ६ जुलै

**खामगाव :** शहरात सुरू असलेल्या रेल्वे अंडरपासच्या बांधकामाचा अंतिम टप्पा सुरू असतानाच पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी गांधी बगिच्यासमोरील रस्त्याच्या कडेला बांधण्यात आलेली काँक्रिटची नाली तोडण्यात आली आहे. या प्रकारामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत असून, संबंधित कामाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. खामगाव शहरातील वाहतूक सुरळीत करण्याच्या उद्देशाने रेल्वे अंडरपासचे काम वेगाने सुरू आहे. हे काम अंतिम टप्प्यात आले असले, तरी पावसाळ्यात अंडरपासमध्ये साचणाऱ्या पाण्याचा निचरा करण्यासाठी गांधी बगिच्यासमोरील रस्त्यालगतची सिमेंट नाली तोडण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी ही नाली बांधण्यात आली होती; मात्र आता ती तोडून नव्याने पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

या प्रकारामुळे संबंधित कामाचे नियोजन योग्य प्रकारे झाले होते का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी बदल !

#### बांधकाम तोडल्याने शासनाच्या निधीचा अपव्यय !

सार्वजनिक विकासकामांसाठी शासनाचा मोठा निधी खर्च केला जातो. त्यामुळे कामांचे आराखडे तयार करताना भविष्यातील गरजा आणि तांत्रिक बाबींचा सखोल विचार होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. आधी नियोजन न करता बांधकाम करणे आणि नंतर त्यात बदल करण्यासाठी तेच बांधकाम तोडणे ही पद्धत केवळ वेळ आणि निधीचा अपव्यय ठरत असल्याची टीका केली जात आहे.

# अनुदान योजनेचे केसेस तिन महिन्यापासून पेंडीग

## उपविभागीय अधिकारी यांच्या कडे शिवसेनेची मागणी

प्रतिनिधी ६ जुलै

**मलकापुर:-** गेल्या तीन महिन्यापासून श्रावण बाळ, संजय गांधी निराधार योजना,दिव्यांग अनुदान मंजुरीच्या केसेस पेंडिंग असल्याने या योजनेच्या लाभार्थ्यावर उपासमारीची वेळ आली असल्याने याबाबत आज शिवसेना (उबाठा)च्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की नाही एप्रिल मे जूनच्या संजय गांधी निराधार योजना दिव्यांग अनुदान योजना त्या तात्काळ निकाली काढून अनुदान वितरण करावे

अन्यथा शिवसेनेला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर ,विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, युवासेना शहरप्रमुख मंगेश सातव ,वाहतूक सेना शहर प्रमुख इम्रान लकी, विभाग प्रमुख चॉद चव्हाण, विभाग प्रमुख सत्तार शाह, रफिकभाई पजायेवाले,शाम थोरबोले, गजानन उंबरकर, हरीदास शिंदे, आकाश मोरे सह आदींच्या सह्या नमूद आहे.

# कर्जमाफीसाठी तारीख पे तारीख देणाऱ्या महायुती सरकारचा शिवसेना (उबाठा)च्या वतीने निषेध

प्रतिनिधी ६ जुलै



**मलकापुर:** महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीची 30 जून 26 रोजी ची अंतिम तारीख दिली होती,हि तारीख उलटूनही आठवडा गेला मात्र अद्यापही शेतकऱ्यांना कर्जमाफी न मिळाल्याने व बँका नवीन पीक कर्ज देत नसल्याने शेतकऱ्यांवर पेरणीची आर्थिक संकट ओढवले आहे. महायुती सरकारचा उपविभागीय अधिकारी यांचे मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन शिवसेना (उबाठा ) पक्षाचे वतीने जाहीर निषेध केला आहे.

निवेदनात नमूद केले आहे की महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा केली व सदरची कर्जमाफी 30 जून 26 पूर्वी देण्याची सांगितली मात्र जून महिना उलटून अद्यापही शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नाही व बँका नवीन शब्द देत नसल्याने शेतकऱ्यांसमोर ते आमच्या आर्थिक संकट ओढवले आहे, कर्जमाफी साठी तारीख पे तारीख देणाऱ्या महायुती सरकारचा शिवसेना जाहीर निषेध करीत असून सरकारने शेतकऱ्यांचा संयम न बघता तात्काळ कर्जमाफी करावी अन्यथा शिवसेनेच्या वतीने उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर ,विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शिवसेना शहरप्रमुख हरीदास गणबास, युवासेना शहरप्रमुख मंगेश सातव ,वाहतूक सेना शहर प्रमुख इम्रान लकी, विभाग प्रमुख चॉद चव्हाण, विभाग प्रमुख सत्तार शाह, रफिकभाई पजायेवाले,शाम थोरबोले, गजानन उंबरकर, हरीदास शिंदे, आकाश मोरे सह आदींच्या सह्या नमूद आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त सिं. राजा येथून पाचाडसाठी स्मृतिज्योत रथयात्रा रवाना

प्रतिनिधी ६ जुलै

**सिंदखेडराजा :** राष्ट्रमाता जिजाऊंच्या पुण्यतिथीनिमित्त सिंदखेडराजा येथून निघालेली जिजाऊ रथयात्रा कोणत्याही एका व्यक्तीची किंवा गटाची नसून संपूर्ण सिंदखेड राजा नगरवासीय आणि राजे जाधवराव परिवाराच्या वंशजांच्यावतीने काढण्यात आली आहे. १८ पगड जाती आणि सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेली ही राष्ट्रमाता जिजाऊंच्या विचाराची रथयात्रा असल्याचे या यात्रेचे आयोजक भागवत राजेजाधव यांनी यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी केले.

राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या ३५३ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जन्मस्थळ असलेल्या ऐतिहासिक सिंदखेड राजा येथून त्यांच्या समाधी स्थळ पाचाड रायगड पर्यंत मार्गस्थ होणाऱ्या 'स्मृती ज्योत रथयात्रेचा' प्रस्थान सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला. येथील ऐतिहासिक राजवाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर कलश पूजन आणि स्मृती ज्योत प्रज्वलित करून या यात्रेला अधिकृतपणे सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी सिंदखेडराजा मतदारसंघाचे माजी आ. तोताराम कायंदे, माजी आ. डॉ. शशिकांत खेडेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष ॲड. नाझेर काझी, नगराध्यक्ष सौरभतायडे, उपनगराध्यक्ष सौ. दीपाली योगेश म्हस्के, माजी नगराध्यक्ष देवीदास ठाकरे, सीताराम चौधरी, विष्णू मेहेत्रे, शिवसेनेच्या नेत्या भाग्यश्री खेडेकर, येथील युवा उद्योजक किरण तायडे, भाजपाचे नेते डॉ. सुनील कायंदे, शिवसेना विधानसभा संपर्कप्रमुख शिवप्रसाद ठाकरे, शिवसेना तालुकाप्रमुख वैभव देशमुख, शिवसेना शहर प्रमुख बालाजी मेहेत्रे, शिवसेनेचे गटनेते संदीप मेहेत्रे, शिवसेनेचे युवा नेता नेते किशोर म्हस्के, नगरसेवक कैलास मेहेत्रे, कैलास म्हस्के, गौतम खरात, नगरसेवक आवेज खान, माजी आरोग्य सभापती राजेंद्र आढाव आणि त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.

सिंदखेड राजा येथून निघालेली ही रथयात्रा जालना, अंबड, गेवराई, बीड, जामखेड, कर्जत आणि राशीन या मार्गाने प्रवास करत राष्ट्रमाता जिजाऊंचे समाधी स्थळ असलेल्या पाचाड येथे पोहोचणार आहे. राजे भगवंतराव मानसिंगराव जाधवराव व वशंज राजे लखुजीराव जाधवराव प्रतिष्ठान सिंदखेडराजा तथा समस्त राजे जाधव, जाधवराव परिवार यांच्यावतीने या भव्य सोहळ्याचे नियोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी उपस्थित सर्व मान्यवरांनी आणि नागरिकांनी रथयात्रेला मनोभावे शुभेच्छा दिल्या. हा सोहळा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी यदु कुलभूषण प्रतिष्ठान व राजे जाधव व जाधवराव परिवारातील सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# अनुदान मागणीसाठी 2 दिवस शाळा बंद आंदोलन

प्रतिनिधी ६ जुलै

**संग्रामपूरः** राज्यभरातील अंशतः अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना पुढील वाढीव अनुदान टप्पा आणि त्रुटी पूर्तता केलेल्या सर्व शाळांना समान टप्पा अनुदान मिळावे, यासह अनेक प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षक समन्वय संघाने ७ व ८ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाची हाक दिली असून या आंदोलनात राज्यभरातील सर्व अंशतः अनुदानित शाळांनी सहभागी होण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य विना अनुदानित कृती समितीचे कार्याध्यक्ष पुंडलीकराव रहाटे यांनी केले आहे.

शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्यातील सर्व अंशतः अनुदानित शाळा बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील हजारो शाळांमधील अध्यापनाचे कामकाज दोन ठप्प राहणार दिवस आहे. शासन स्तरावर अनेक प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्यापही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे शिक्षकांमध्ये संतापाची लाट तयार झाली आहे. मुंबई येथील आझाद मैदानावर पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर संघटनेच्या वतीने गेल्या पंधरवड्यापासून आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शिक्षक समन्वय समितीने अखेर दोन दिवस शाळा बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. या दरम्यान अंशतः अनुदानीत शाळेतील शिक्षकांनी आणि शाळा व्यवस्थापन समितीने आपल्या शाळा बंद ठेवून राजधानी मुंबईत आझाद मैदानावर उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा. प्रत्येक शाळेने या आंदोलनात सहभाग नोंदवून शासनापर्यंत आपल्या न्याय मागण्या पोहोचवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन शिक्षक समन्वय संघाने केले आहे. शाळा बंद आंदोलना दरम्यानचा अभ्यासक्रम पुढील काही दिवसात अधिकच्या तासिका घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन शिक्षकांनी केले आहे.

# शेतकरी कर्जमुक्ती योजना

प्रतिनिधी ६ जुलै

**बुलढाणा:** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना वेळेत व सुरळीत मिळावा, यासाठी अर्जासोबत सादर करण्यात येणारी माहिती व कागदपत्रे अचूक असणे आवश्यक आहे. अर्ज प्रक्रियेदरम्यान आवश्यक बाबींची पूर्वतयारी केल्यास अधिक सुलभहोण्यास मदत होते. अर्ज करण्यापूर्वी पूर्वतयार आवश्यक बाबीची पडताळणी खातरजमा करा प्रक्रिया शेतकऱ्यांनी आधार कार्ड, बँक खाते, कर्ज खात्याची माहिती तसेच इतर आवश्यक कागदपत्रांवरील नाव व तपशील एकसारखे असल्याची खात्री करून घ्यावी. नाव, जन्मतारीख अथवा इतर तपशीलांमध्ये विसंगती असल्यास संबंधित कार्यालयामार्फत ती दुरुस्त करून घ्यावी.

# टिळक पुतळाजवळ वाहतूक कोंडी!

## पर्यायी मार्गावर वाहतुकीचा ताण, चालक त्रस्त !



प्रतिनिधी ६ जुलै

**खामगाव:** शहरातील शर्मा टर्निंग येथील पूल जीर्ण झाल्याने त्या मार्गावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे. परिणामी, वाहतूक टिळक पुतळा-बाजार समिती मार्गावर वळविण्यात आली असून, आधीच वर्दळीच्या असलेल्या या मार्गावर अतिरिक्त वाहतुकीचा भार पडला आहे.

त्यामुळे टिळक पुतळा चौफुली परिसरात दररोज वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या बदलामुळे सकाळ आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत परिस्थिती अधिक गंभीर होत आहे. चौफुली परिसरात वाहनांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने वाहने संथ गतीने पुढे सरकत आहेत. काही वेळा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, नागरिकांना मार्गक्रमण करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. पर्यायी मार्ग म्हणून वापरल्या जात असलेल्या टिळक पुतळा-बाजार समिती रस्त्यावर पूर्वीपासूनच मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. त्यात आता अतिरिक्त वाहतूक वळविण्यात आल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. या वाहतूक कोंडीमुळे अपघातांची शक्यताही वाढत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

### पुलाच्या दुरुस्तीचे काम तत्काळ करण्याची मागणी

शर्मा टर्निंगवरील पूल बंद झाल्यानंतर शहरातून अकोला, शेगाव, नांदुरा, तसेच बाजार समितीच्या दिशेने जाणाऱ्या चारचाकी, मालवाहू आणि प्रवासी वाहनांचा प्रवाह टिळक पुतळा मार्गे वळविण्यात आला आहे. त्यामुळे या मार्गावर पूर्वीपेक्षा वाहनांची संख्या लक्षणीय वाढली असून, दिवसभर वाहतुकीचा दबाव कायम राहत आहे.

पुलाची दुरुस्ती किती कालावधीत पूर्ण होणार, याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता आहे.

पुलाचे काम लवकर पूर्ण झाल्यास शहरातील वाहतुकीचा ताण कमी होईल, अशी अपेक्षा वाहनचालक आणि व्यापाऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

# दलित, भूमिहीन कुटुंबांच्या हक्काच्या जागेवर केंद्रीय विद्यालय

सिटी न्यूज सुपरफास्ट च्या बातमीनंतर....

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला :** अकोला तालुक्यातील मौजे गुडधी येथील दलित, मागासवर्गीय आणि भूमिहीन नागरिकांच्या हक्काच्या जागेवर त्यांच्या संमतीशिवाय 'केंद्रीय विद्यालय' उभारण्याचा घाट प्रशासनाकडून घातला जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या चुकीच्या निर्णयामुळे १३६ गरीब कुटुंबांच्या निवार्याचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने हा करार रद्द न केल्यास तीव्र कायदेशीर आंदोलन छेडण्याचा इशारा गुडधी येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.आज मोठ्या संख्येत स्थानिकांनी एकत्र येत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. गुडधी येथील नागरिकांनी दिलेल्या निवेदनानुसार, हे सर्व कुटुंब मागील ५० वर्षांपेक्षा अधिक काळापासून या भागात अत्यंत हलाखीच्या आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत परिस्थितीत मोलमजुरी करून जीवन जगत आहेत. या भूमिहीन कुटुंबांना सन्मानाने जगता यावे व हक्काचे घर मिळावे म्हणून शासनाने मौजे गुडधी येथील गट क्रमांक व उपविभाग १३३/अ/ब/क मधील त्र३.५०त्र् हेक्टर आर जमीन अधिग्रहीत केली होती. या जागेवर १३६ कुटुंबांना सरकारी गावठाण प्लॉटचे पट्टे वाटप करण्यात आले होते. यासाठी नागरिकांनी शासकीय चलनाची रक्कमेचा भरणा देखील केला होता, ज्याच्या पावत्या आणि ताबा पत्र आजही या नागरिकांकडे सुरक्षित आहेत.या निवेदनावर महादेव अमृता चोरपगार, गणेश शिरसार, भारत डोंगरे, सचिन कीर्तक, नागसेन गजभिये, सुरेखा शिरसाठ, शोभा डोके यांच्यासह गुडधी येथील शेकडो त्रस्त महिला व पुरुषांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता या संवेदनशील मुद्द्यावर जिल्हाधिकारी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





### तर अनुचित घटनेला प्रशासन जबाबदार राहणार !

» आम्हाला मिळालेले प्लॉट आम्ही कधीही शासनाकडे जमा केलेले नाहीत. त्यामुळे आमचा कायदेशीर हक्क डावलून ही जागा केंद्रीय विद्यालयाला देणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे,' असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. पूर्वी या विद्यालयासाठी आगरकर विद्यालय, अकोला येथील जागा निश्चित झाली होती, तिथेच ते विद्यालय हलवावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.'प्रशासनाच्या या चुकीच्या निर्णयामुळे १३६ गरीब कुटुंबांवर मोठे संकट कोसळले आहे. जर आमच्या संमतीशिवाय ही जागा घेतली गेली, तर आम्ही कायदेशीर आंदोलन उभे करू. यादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी आणि प्रशासनाची राहील.'

— गुडधी ग्रामस्थ (अकोला)

### आता जागाच हिरावण्याचा प्रयत्न !

» नागरिकांचा आरोप आहे की, पट्टे वाटप करून ताबा दिल्यानंतर आजतागायत प्रशासनाने या भागात रस्ते, पथदिवे, वीज पुरवठा किंवा पाण्याची कोणतीही सोय केलेली नाही. वारंवार मागणी करूनही लेआउट अंतिम करण्यात आले नाही. एकीकडे हक्काच्या जागेवर घरे बांधण्यासाठी सुविधा दिल्या जात नसताना, दुसरीकडे नागरिकांकडून कोणताही ताबा परत न घेता, गैरमार्गाने ही जागा केंद्रीय विद्यालयाला देण्याच्या हालचाली प्रशासकीय पातळीवर सुरू आहेत.


घरकुलाची जागा केंद्रीय विद्यालयासाठी
गट क्रमांक १३३ मधील जागा तर घरकुलासाठी, गुडधी येथे केंद्रिय विद्यालय होणार की नाही

# राजापेठ पोलीसांनी गहाळ झालेले 25 लाख रूपयांचे सोने फिर्यादीला दिले परत

प्रतिनिधी ६ जुलै

**अमरावती :** राजापेठ पोलीसांनी गहाळ झालेले 25,00,000/- रूपये चे सोने फिर्यादील परत देण्यात आले. फिर्यादी गजानन अंबर वर्धे, वय 52 वर्षे, रा. साईनगर, अमरावती हयांनी पोलीस स्टेशनला दिनांक 1 जुले रोजी येवुन तकार दिली की, त्यांची पत्नी संगीता वर्धे हिला पोटा संबंधी विकार असल्याने त्यांचा उपचार ए.आय.जी. हॉस्पीटल, हैद्राबाद येथे चालु होता. फिर्यादीचे पत्नीची प्रकृत्ती अचाणकपणे खराब झाल्याने फिर्यादी, सोबत त्याची पत्नी व मुलगी असे चारचाकी वाहनाने हैद्राबाद येथे दिनांक 29.06.2026 ला रवाना झाले. फिर्यादीने जाते वेळी पत्नीच्या उपचारासाठी जास्त खर्च येणार असल्याने त्यांनी त्यांचे पत्नीचे सोने वजन अंदाजे 140 ते 150 ग्रॅम 25,00,000 लाख रूपयांचे असे एका लाल रंगाचे कॉलेज बॅगमध्ये भरून गाडीमध्ये घेवुन गेले. दिनांक 30.06.2026 रोजी ए.आय.जी. हॉस्पीटल, हैद्राबाद येथे फिर्यादीचे पत्नीचा उपचार चालु असतांना तेथील डॉक्टरांनी फिर्यादीला त्यांचे पत्नीची प्रकृती अत्यंत खालावलेली आहे. तुम्ही तिला घेवुन जा. असे सांगीतल्याने फिर्यादी हैद्राबाद येथुन त्यांचे पत्नीला ॲम्बुलन्समध्ये बसुन अमरावतीला परत येण्यास निघाले. फिर्यादीचे पत्नीचे रस्त्यामध्ये पल्स कमी झाल्याने दिनांक 30.06.26 रोजी अदीलाबाद येथील शासकीय रुग्नालयामध्ये नेले असता तेथील डॉक्टरांनी फिर्यादीची पत्नी मयत झाली असल्याचे सांगीतले. तेथून फिर्यादी दिनांक 30.06.26 रोजी अमरावतीला येवून फिर्यादीन त्यांचे पत्नीचा अंतवीधी केला. अंतविधी झाल्यानंतर फिर्यादीने गाडीमध्ये ठेवलेली लाल रंगाची बॅग चेक केली असता ति दिसुन आली नाही. वरून फिर्यादीचे लक्षात आले की, त्यांचे पत्नीचे सोने वजन अंदाजे 140 ते 150 ग्रॅम वजनाचे 25,00,000 लाख रूपयांचे हे चोरी गेली आहे. असी तकार पोलीस स्टेशन राजापेठ येथे प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी घटनेची गांभीर्य लक्षात घेवुन मा. पोलीस आयुक्त यांना घटनेची माहीती देवुन त्यांचे आदेशाने तत्काळ डि. बी पथकाला पुढील सुचना देवुन फिर्यादी व डिबी पथकातील पोकॉ अंकुश काळे, पोकॉ नरेश बावने, यांना फिर्यादी सोबत हैद्राबाद येथे रवाणा केले. पथकातील पोलीसांनी हैद्राबाद येथील एआयजी हॉस्पीटल, अदीलाबाद येथील शासकीय हॉस्पीटल, तसेच अदीलाबाद समोरील जनता रेस्टॉरन्ट येथील 30 ते 40 सिसीटीव्ही कॅमेरे चेक करून दिवस रात्र अथक परीश्रम केले. हैद्राबाद ते अदीलाबाद रोडवरील जनता रेस्टॉरन्ट येथुन फिर्यादीची लाल रंगाची बॅग ज्यामध्ये फिर्यादीचे पत्नीचे सोने वजन अंदाजे 140 ते 150 ग्रॅम वजनाचे 25,00,000 लाख रूपयांचे तसेच उपचाराचे कागदपत्र मिळुन आले. सदरचे फिर्यादीचे 25,00,000 रूपयांचे सोने व बॅगमधील महत्वाचे कागदपत्र फिर्यादीला परत देण्यात आले आहे. सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त,श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि 2 अमरावती, संजय खटाळे, सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, सपोनी नितीन शिंदे, पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकॉ पंकज खटे, पोहेका रवी लीखीतकर, पोहेकॉ शशी शेळके, पोकों अंकुश काळे, पोकॉ नरेश बावने, पोकॉ प्रवीण बेलोकार, पोका अर्जुन कदम, पोकों अमोल खंडेजोड, पोकों आकाश यादव, पोकों यश ओगले, यांनी केली.



# अकोल्यात युवकावर प्राणघातक हल्ला!

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला :** अकोला शहरात रविवारी रात्री घडलेल्या एका खळबळजनक घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील गजबजलेल्या परिसरात असलेल्या अनिल कोल्ड ड्रिंक्ससमोर एका युवकावर अज्ञात हल्लेखोरांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात सादिक खान रा. जेतवन नगर, खदान हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रविवारी रात्री सादिक खान हे अनिल कोल्ड ड्रिंक्स परिसरात असताना काही व्यक्तींनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. हल्लेखोरांनी धारदार शस्त्र अथवा इतर घातक साधनांचा वापर केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, या हल्ल्यात सादिक खान गंभीररीत्या जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तत्काळ त्यांना उपचारासाठी जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. या घटनेचे सर्वाधिक धक्कादायक वैशिष्ट्य म्हणजे हा प्राणघातक हल्ला जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर घडला आहे. त्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था आणि पोलिसांच्या गस्त व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात आणि पोलीस प्रशासनाच्या प्रमुख कार्यालयाच्या जवळच अशा प्रकारची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, जुना वाद, वैयक्तिक वैमनस्य किंवा इतर कोणत्या कारणातून हा हल्ला झाला, याचा तपास पोलीस करीत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत असून, हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# एक्सपायरी झालेला माल ग्राहकांच्या मस्तकी मारला जातो?

## स्थानिक एफडीए यंत्रणा झोपली का

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला:** अकोला शहरातील नागरिकांच्या आरोग्याची हेळसांड करणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही व्यापारी एक्सपायरी झालेला पॅकिंग किराणा व खाद्यपदार्थ स्वस्त दरात लूज करून विकत आहेत. स्थानिक अन्न औषधी प्रशासनाच्या अधिका-यांनी या गंभीर प्रकाराची शहनिशा करून संबंधितांवर कारवाई करावी. कारण नागरिकांच्या आरोग्याशी चाललेला खेळ नाही तर जीवनावश्यक अधिनियमाची पायमल्ली आहे. त्यामुळे कथीत प्रकार थांबणे गरजेचे आहे.

किराणा माल पॅकिंग मध्ये विकला जात आहे. इतकेच नाही तर खाद्य तेल देखील सुटे न विकता पॅकिंग मध्ये विकण्याचे आदेश देण्यात आले होते. असे असताना एक्सपायरी झालेला माल सुटा करून विकला जात असेल तर तो गुन्हा आहे. बाजारात असा माल येता कामा नये. नागरिकांच्या आरोग्याशी चाललेला असा खेळ तातडीने थांबवावा लागेल. अन्न औषधी प्रशासनाने याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.



# मारहाण करून घराला लावली आग

प्रतिनिधी ६ जुलै

**अकोला :** खदान पोलीस स्टेशन हद्दीतील मलकापूर येथील राजरत्न कॉलनी परिसरात घडलेल्या धक्कादायक घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, एका कुटुंबाला जातीवाचक शिवीगाळ, मारहाण आणि घरातील साहित्य जाळून नुकसान केल्याप्रकरणी पोलिसांनी गंभीर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह भारतीय दंड संहितेतील विविध गंभीर कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

शहरातील मलकापूर येथील राजरत्न कॉलनी परिसरात ३ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादीने दिलेल्या जबाबानुसार, आरोपींनी त्यांच्या पतीला अडवून त्यांची कॉलर पकडली व जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी आरोपींनी फिर्यादीच्या पतीच्या छातीवर आणि पोटावर बुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, आपल्या पतीला वाचविण्यासाठी फिर्यादी पुढे आल्या असता आरोपींनी त्यांना अश्लील शिवीगाळ केली. तसेच जातीवाचक शब्दांचा वापर करून अपमानित केल्याचाही गंभीर आरोप फिर्यादीने आपल्या तक्रारीत केला आहे.

आरोपींनी सव्वालाखांचे नुकसान या आगीत घरातील विविध वस्तू जळून खाक झाल्या असून, सुमारे १ लाख २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीने खदान पोलीस स्टेशन येथे दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. घरातील जीवनावश्यक वस्तूंवर ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी इंदोरीकर, गौरव इंदोरीकर आणि गौरव जानूनकर यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४३६, ४२७, ३२३, ५०४, ५०६, ३४ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३ (१) (२), ३(१) (स), ३(२) (व्हीए) आदी कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, उपविभागीय अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक केदारे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक लहाने यांच्याकडून करण्यात येत आहे.

# जीर्ण झालेली शाळेची स्वच्छतागृहाची भिंत कोसळली



**मूर्तिजापूर :** स्थानिक जुनी वस्तीतील हलवाई पुरी येथील नॅशनल उर्दू हायस्कूलमध्ये शनिवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे विद्यार्थ्यांच्या स्वच्छतागृहाची भिंत अचानक कोसळल्याची घटना घडली.

सकाळच्या सत्रातील सुट्टी होताच ही भिंत थेट रस्त्यावर कोसळल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, सुदैवाने घटना टळली. यावेळी रस्त्यावरून ये-जा करणारे पादचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी कोणालाही दुखापत झाली नसल्याने पालक व नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. घटनेनंतर संस्थेच्या अध्यक्षांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. सोमवार व मंगळवार या दोन दिवसांची सुट्टी जाहीर केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून सर्व सोयी-सुविधांनी युक्त दुमजली नव्या वास्तूमध्ये शाळेचे स्थलांतर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षांनी दिली. या घटनेमुळे जुन्या इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून शैक्षणिक संस्थांच्या इमारतींची वेळोवेळी तपासणी होण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## काळे ढग आणि अस्वस्थ रस्ते....



शेतीसाठी पाऊस पाहिजे. रोजच्या जगण्यासाठी पाऊस आणि पाणी पाहिजे. पण, या डाबकी रोडवर मात्र रहिवाशांना पाऊस नकोसा असतो. भरून आलेलं आभाळ 'थोड्याच वेळात सगळं चिंब होणार... पाऊस पडण्याआधीची ही शांतता आणि धावपळ वेगळीच असते.' 'काळ्या ढगांच्या सावलीत, रोजची धावपळ... पावसाची चाहूल मात्र लागलीये. **(छाया - राम तिवारी)**

# सगणापूरमध्ये घराला भीषण आग

प्रतिनिधी ६ जुलै

**यवतमाळ :** मारेगाव तालुक्यातील सगणापूर येथे रविवारी (दि. ५) दुपारी एका घराला भीषण आग लागून गरीब कुटुंबाचा संसार अक्षरशः राख झाला. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, या दुर्घटनेत सुमारे तीन ते साडेतीन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. ग्रामपंचायत कार्यालयाजवळ राहणारे दिनकर अर्जुन मोहितकार यांच्या घरात दुपारी सुमारे एक वाजताच्या सुमारास ही घटना घडली. अचानक लागलेल्या आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने घरातील फ्रिज, दूरदर्शन संच, पंखे, कपडे, घरगुती साहित्य तसेच इतर संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्या. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य नष्ट झाल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. घटनेची माहिती मिळताच तलाठी, पोलीस, ग्रामसेवक आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. त्यामुळे आग शेजारील घरांपर्यंत पोहोचण्याचा धोका टळून मोठी दुर्घटना टळली.

दिनकर मोहितकार यांच्याकडे स्वतःची शेती नसून ते ठेक्याने शेती आणि रोजंदारी मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. या आगीत त्यांचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाल्याने कुटुंबासमोर उपजीविकेचे मोठे संकट उभे ठाकले आहे. महसूल विभागाकडून पंचनामा करण्यात येत असून, अधिकृत अहवालानंतर नुकसानीची नेमकी रक्कम स्पष्ट होणार आहे. दरम्यान, बाधित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत, जीवनावश्यक साहित्य आणि शासकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.



### पर्यायी मथळे :

» सगणापूरमध्ये आगीचे तांडव; मजुराचा संसार क्षणात राख

» शॉर्टसर्किटचा फटका; दिनकर मोहितकार कुटुंबावर संकटाचा डोंगर ग्रामस्थांच्या सतर्कतेने मोठी दुर्घटना टळली; घरातील सर्व साहित्य जळाले सगणापूरमध्ये भीषण आग;

» तीन लाखांहून अधिक नुकसान रोजंदारी करणाऱ्या कुटुंबाचा संसार भस्म; मदतीची ग्रामस्थांची मागणी

# पेरणीसाठी गेलेल्या महिलेला जातीवाचक शिवीगाळ

प्रतिनिधी ६ जुलै

**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेला जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला 1 जुलै रोजी दुपारी सुमारे 12 वाजेच्या सुमारास देवरण रोडलगत असलेल्या गट क्रमांक 97 मधील शेतात पेरणीच्या कामासाठी गेली होती. त्यावेळी आरोपींनी शेतात येण्याच्या कारणावरून वाद घालत कथितरित्या अश्लील व जातीवाचक शब्दांचा वापर करून शिवीगाळ केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तिघांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

फिर्यादीच्या डोक्यावर काठीने मारहाण करून ब्लाऊज फाडल्याचा आरोप आहे. तसेच इतर आरोपींनी फिर्यादीच्या पती व मुलालाही लाथाबुक्क्या आणि थापडा मारून मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याशिवाय जिवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस सिटी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक धर्मेंद्र जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजू वानखडे व हेपोकॉ लोणकर करीत आहेत.

# शाळांमध्ये एकाच बुकस्टॉलवरून पुस्तके घेण्याची सक्ती थांबवा

प्रतिनिधी ६ जुलै

**मूर्तिजापूर :** शाळांमध्ये एकाच बुक स्टॉल वर पुस्तके घेण्याची सक्ती करू नये अशी मागणी साईराज मित्र मंडळ कडून निवेदनात करण्यात आली. मागणी मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला. यावेळी साईराज मित्र मंडळाचे अध्यक्ष रवी चौहान, उपाध्यक्ष दिनेश श्रीवास यांच्यासह सुनील भोजगडिया, विलास वानखेडे, विलास नसले, विष्णू लोडम, शाम काकडे, संतोष इंगोले, मोहम्मद इम्रान, रमेश दर्याणी, दिगंबर सदार आणि मनोज अहेरवार उपस्थित होते.

एका बुक स्टॉलशी संगनमत करून साहित्य खरेदीची सक्ती करणाऱ्या शाळांविरोधात तातडीने कारवाई करावी, अन्यथा संबंधित शाळा व बुकस्टॉल विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा साईराज मित्र मंडळाने दिला आहे. शहरातील इंग्रजी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, वह्या व इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी एका विशिष्ट बुकस्टॉलची सक्ती केली जात असल्याचा आरोप साईराज मित्र मंडळाने केला आहे. यासंदर्भात मंडळाने पंचायत समितीतील गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रत्येक शाळेच्या सूचना फलकावर किमान पाच बुकस्टॉलची नावे प्रदर्शित करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे पालकांना आपल्या पसंतीच्या दुकानातून शैक्षणिक साहित्य खरेदी करता येईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135